भारत सरकार

**विधि व न्याय मंत्रालय**

सत्यमेव जयते

# चिट फंड अधिनियम, १९८२

**(सन १९८२ चा अधिनियम क्रमांक ४०)**

[ रोजी यथाविद्यमान ]

# The Chit Funds Act, 1982

**(Act No. 40 of 1982)**

[ *As in force on the* ]

*

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

**२०१७**

[ **किंमत** : रुपये ]

## चिट फंड अधिनियम, १९८२

## कलमांचा क्रम

**कलमे**

प्रकरण एक

**प्रारंभिक**

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. अधिनियम अन्य कायदे, समयलेख, नियमावली इत्यादींवर अधिभावी असणे.

प्रकरण दोन

**चिटची नोंदणी, चिटच्या व्यवसायाचा प्रारंभ व तो चालवणे**

४. अधिनियमान्वये मंजुरी न मिळालेल्या किंवा नोंदणीकृत नसलेल्या चिटना मनाई.

५. विवक्षित अटींनुसार असेल त्याखेरीज वर्गणी मागण्यास मनाई.

६. चिट कराराचा नमुना.

७. चिट करार दाखल करणे.

८. कंपनीने चिटचा प्रारंभ इत्यादीसाठी किमान आवश्यक भांडवल व राखीव निधी उभारणे.

९. चिट सुरू करणे.

१०. वर्गणीदारांना द्यावयाच्या चिट कराराच्या प्रती.

११. " चिट " , " चिटफिंड ", "चिट्ठी" किंवा "कुरी" या शब्दांचा वापर.

१२. कंपनीस चिट व्यवसायाव्यतिरिक्त इतर व्यवसाय करण्यास मनाई.

१३. चिटची एकूण रक्कम.

१४. निधीचा वापर.

१५. चिट करारपत्रातील फेरफार.

१६. चिट सुरू करण्याचा दिनांक, वेळ व ठिकाण.

१७. कार्यवाहीचे कार्यवृत्त.

१८. निबंधकाकडे सादर करावयाच्या कार्यवृत्ताच्या प्रती.

१९. व्यवसायाचे नवीन ठिकाण उघडण्यावर निर्बंध.

प्रकरण तीन

**कार्यदेशकाचे हक्क व कर्तव्ये**

२०. कार्यदेशकाने द्यावयाची प्रतिभूती.

२१. कार्यदेशकाचे हक्क.

२२. कार्यदेशकाची कर्तव्ये.

२३. कार्यदेशकाने ठेवावयाची पुस्तके, अभिलेख इत्यादी.

२४. ताळेबंद.

२५. वर्गणीदाराच्या बाबतीत कार्यदेशकाचे दायित्त्व.

२६. कार्यदेशकाचे माघार घेणे.

प्रकरण चार

**बक्षीस न मिळालेल्या वर्गणीदारांचे हक्क आणि कर्तव्ये**

२७. बक्षीस न मिळालेल्या वर्गणीदारांनी वर्गणी देणे व पावत्या घेणे.

२८. कसूरदार वर्गणीदारांना काढणे.

२९. बदली वर्गणीदार.

३०. कसूरदार वर्गणीदाराला देय रक्कम.

प्रकरण पाच

**बक्षीस मिळालेल्या वर्गणीदारांचे हक्क व कर्तव्ये**

३१. बक्षीस मिळालेल्या वर्गणीदाराने प्रतिभूती देणे.

३२. बक्षीस मिळालेल्या वर्गणीदाराने नियमितपणे वर्गणी देणे.

३३. कार्यदेशकाने लेखी नोटिशीद्वारे भविष्यकालीन वर्गणींची मागणी करणे.

प्रकरण सहा

**हस्तांतरणे**

३४. कार्यदेशकाच्या हक्कांच्या हस्तांतरणावर निर्बंध.

३५. बक्षीस न मिळालेल्या वर्गणीदाराच्या हक्काचे हस्तांतरण लेखी असणे.

३६. कार्यदेशकाने हस्तांतरणास मान्यता देणे.

३७. हस्तांतरणाची नोंद.

प्रकरण सात

**वर्गणीदारांच्या सर्वसदस्य मंडळांची बैठक**

३८. वर्गणीदारांच्या सर्वसदस्य मंडळांची बैठक.

प्रकरण आठ

**चिटची समाप्ती**

३९. विवक्षित प्रकरणांमध्ये चिट पुढे चालू ठेवण्याची तरतूद.

४०. चिटची समाप्ती.

४१. अनुमती किंवा संमतीची प्रत निबंधकाकडे दाखल करावयाची.

४२. बक्षीस न मिळालेल्या वर्गणीदारांच्या वर्गण्या परत करणे.

४३. चिटच्या मत्तांवर वर्गणीदाराच्या प्रदानाचा प्रथम भार.

प्रकरण नऊ

**दस्तऐवजांची तपासणी**

४४. कार्यदेशकाने चिट अभिलेखांची तपासणी करण्याची विवक्षित वर्गणीदारांना परवानगी देणे.

४५. कार्यदेशकाकडून चिट अभिलेख्यांचे परिरक्षण.

४६. निबंधकाकडून चिटची पुस्तके व अभिलेख यांची तपासणी.

४७. चिटची पुस्तके व अभिलेख तपासण्याचा रिझर्व्ह बँकेचा अधिकार.

प्रकरण दहा

**चिटचे समापन**

४८. ज्या परिस्थितीत चिट समापित करता येईल ती परिस्थिती.

४९. समापनासाठी अर्ज.

५०. समापन कार्यवाहीला रोध करणे.

५१. समापन आदेशाचा प्रारंभ व परिणाम.

५२. व्यादेश.

५३. निबंधकाचे अधिकार.

५४. निबंधकाकडे किंवा इतर व्यक्तीकडे चिटच्या मत्ता निहित असणे.

५५. समापन आदेश काढण्यात आल्यावर दावे इत्यादी तहकूब असणे.

५६. समापनाच्या आदेशाची अधिसूचना.

५७. कार्यदेशक इत्यादींची नादारी किंवा कंपनीचे समापन यानंतर समापनाची कार्यवाही बंद होणे आणि अशा कार्यवाहीचे हस्तांतरण.

५८. कार्यदेशकाला भरपाई देणे.

५९. अपील करण्याचा हक्क.

६०. मर्यादा.

प्रकरण अकरा

**अधिकाऱ्यांची नियुक्ती व फी ची उगराणी**

६१. निबंधक व इतर अधिकारी यांची नियुक्ती.

६२. निबंधकाच्या कार्यालयातील दस्तऐवजांची तपासणी.

६३. फी ची उगराणी.

प्रकरण बारा

**विवाद व लवाद**

६४. चिटच्या धंद्याच्या संबंधातील विवाद.

६५. मुदत मर्यादा.

६६. विवाद मिटवणे.

६७. विवाद मिटवण्याची कार्यवाही आणि निबंधक किंवा नामनिर्दिष्ट व्यक्ती यांचे अधिकार.

६८. न्यायनिर्णय आणि इतर वादकालीन आदेश यांच्यापूर्वी जप्ती.

६९. निबंधक किंवा नामनिर्दिष्ट व्यक्ती यांचा निर्णय.

७०. निबंधकाच्या किंवा नामनिर्दिष्ट व्यक्तीच्या निर्णयाविरुद्ध अपील.

७१. पैसे कसे वसूल करावयाचे.

७२. प्रमाणपत्र देण्यात आल्यानंतर मालमत्तेचे खाजगी हस्तांतरण कार्यदेशकाच्या विरुद्ध शून्यवत असणे.

प्रकरण तेरा

**संकीर्ण**

७३. रिझर्व्ह बँकेची सल्लागार म्हणून भूमिका.

७४. अपिले.

७५. दस्तऐवज दाखल करण्यासाठी मुदत वाढवून देण्याचे निबंधकाचे अधिकार.

७६. शास्ती.

७७. दुसऱ्या व त्यानंतरच्या दोषसिद्धिसाठी शास्ती.

७८. द्रव्यदंडाचे उपयोजन.

७९. कंपन्यांनी केलेले अपराध.

८०. अपराधांची दखल.

८१. अपराध आपसात मिटवण्याचा अधिकार.

८२. कोणत्याही जागेत प्रवेश करण्याचा व झडती घेण्याचा व कोणतेही दस्तऐवज जप्त करण्याचा अधिकार.

८३. अधिकारी लोकसेवक असणे.

८४. अधिकार सोपविणे.

८५. विवक्षित चिटला अधिनियम लागू नसणे.

८६. बँकांनी चिटचा धंदा न करणे.

८७. सूट देण्याचा अधिकार.

८८. अधिनियमाअन्वये केलेल्या कृतीला संरक्षण.

८९. नियम करण्याचा अधिकार.

९०. निरसन व व्यावृत्ती.

**अनुसूची**

**शब्दसूची - मराठी - इंग्रजी**

**इंग्रजी - मराठी.**

# चिट फंड अधिनियम, १९८२

**(सन १९८२ चा अधिनियम क्रमांक ४०)**

( रोजी यथाविद्यमान)

[१९ सप्टेंबर, १९८२]

**चिट फंड व त्याच्याशी संबंधित बाबींचे विनियमन करण्याची तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय प्रजासत्ताकाच्या तेहतिसाव्या वर्षी संसदेकडून तो पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

प्रकरण एक

**प्रारंभिक**

**१.** (१) या अधिनियमास, “चिट फंड अधियनियम, १९८२” असे म्हणावे. **संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.**

(२) याचा विस्तार जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतात राहील.

(३) हा अधिनियम, केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे जो दिनांक नेमून देईल अशा दिनांकापासून अंमलात येईल आणि निरनिराळ्या राज्यांसाठी निरनिराळे दिनांक नेमून देता येतील.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,— **व्याख्या.**

**१९५५ चा २३.** (क) “ मान्यताप्राप्त बँक ” याचा अर्थ, भारतीय स्टेट बँक अधिनियम, १९५५ याच्या कलम ३ अन्वये घटित करण्यात आलेली भारतीय स्टेट बँक किंवा भारतीय स्टेट बँक (दुय्यम बँका) अधिनियम,
**१९५९ चा ३८.** १९५९ याच्या कलम ३ अन्वये घटित करण्यात आलेली दुय्यम बँक किंवा बँक व्यवसाय कंपन्या (उपक्रमांचे
**१९७० चा ५.** संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९७० याच्या कलम ३ अन्वये घटित करण्यात आलेली तद्नुरूप नवीन
**१९७६ चा २१.** बँक किंवा प्रादेशिक ग्रामीण बँक अधिनियम, १९७६ याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेली
**१९८० चा ४०.** प्रादेशिक ग्रामीण बँक किंवा बँक व्यवसाय कंपन्या (उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९८० याच्या कलम ३ अन्वये घटित केलेली तद्नुरूप नवीन बँक किंवा बँक व्यवसाय विनियमन अधिनियम,
**१९४९ चा १०.** १९४९ याच्या कलम ५, खंड (ङ) अन्वये व्याख्या केल्यानुसार असलेली बँक व्यवसाय कंपनी किंवा त्या अधिनियमाच्या कलम ५१ अन्वये केंद्र सरकारने अधिसूचित केलेली अशी बँक व्यवसाय संस्था किंवा या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी रिझर्व्ह बँकेशी विचारविनिमय करून राज्य शासनाने मान्य केलेली अशी अन्य बँक व्यवसाय संस्था, असा आहे ;

(ख) “ चिट ” याचा अर्थ, ज्या व्यवहाराद्वारे किंवा अन्वये एखादी व्यक्ती विनिर्दिष्ट संख्येतील व्यक्तींशी असा करार करते की, त्यांच्यापैकी प्रत्येक जण नियतकालिक हप्त्याच्या रूपाने विशिष्ट रक्कम (किंवा त्याच्या ऐवजी विशिष्ट परिमाणातील धान्य) निश्चित कालावधीसाठी देईल आणि असा प्रत्येक वर्गणीदार, चिठ्ठीद्वारे किंवा लिलावाद्वारे किंवा देऊ करून किंवा चिट करारात विर्निर्दिष्ट करण्यात येईल अशा इतर रीतीने निर्धारित करण्यात आली असेल अशी त्याची पाळी येईल तेव्हा बक्षिसाच्या रकमेस हक्कदार असेल असा व्यवहार, मग त्याला चिट, चिट फंड, चिठ्ठी, कुरी किंवा अन्य कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो ;

**स्पष्टीकरण.—**जर एखाद्या व्यवहारात,—

(एक) वर्गणीदारांपैकी सर्व नाहीत परंतु काही वर्गणीदारांना भविष्यकालीन वर्गणी देण्याच्या कोणत्याही दायित्वाविना, बक्षिसाची रक्कम मिळाली तर, किंवा

(दोन) सर्व वर्गणीदारांना भविष्यकालीन वर्गणी देण्याच्या दायित्वासह पाळीद्वारे चिट रक्कम मिळाली तर,

असा व्यवहार, या खंडाच्या अर्थानुसार चिट असणार नाही.

(ग) “ चिट करार” याचा अर्थ, चिट संबंधातील कार्यदेशक व वर्गणीदार यांच्यामधील करार नियमावलीचा अंतर्भाव असलेले दस्तऐवज, असा आहे ;

(घ) “चिट रक्कम” याचा अर्थ, सर्व वर्गणीदारांनी कसर किंवा अन्यथा कोणत्याही वजावटीविना, चिटच्या कोणत्याही हप्त्यासाठी देय असलेली वर्गणीची एकूण रक्कम, असा आहे ;

(ङ) “चिट व्यवसाय” याचा अर्थ, चिट चालविण्याचा व्यवसाय करणे, असा आहे ;

(च) “कसूरदार वर्गणीदार” याचा अर्थ, चिट कराराच्या अटीनुसार देय असलेली वर्गणी देण्यात ज्याने कसूर केली आहे असा वर्गणीदार, असा आहे ;

(छ) “कसर” याचा अर्थ, बक्षिस मिळालेल्या वर्गणीदाराला, चिट फंडाच्या कराराच्या अटीनुसार जी किंवा जे सोडून देणे आवश्यक आहे आणि उक्त करारानुसार चिट फंड चालविण्याचा खर्च म्हणून किंवा वर्गणीदारांमध्ये वाटप करण्यासाठी किंवा दोन्हीसाठी जी वेगळी ठेवली किंवा जे वेगळे ठेवले असेल अशी रक्कम किंवा धान्याचे परिणाम, असा आहे ;

(ज) “लाभांश” याचा अर्थ, चिट करारानुसार चिटच्या प्रत्येक हप्त्यामध्ये वर्गणीदारांना तथाप्रमाण वाटप करण्यासाठी उपलब्ध असलेल्या कसरीच्या रकमेमधील वर्गणीदाराचा हिस्सा, असा आहे ;

(झ) “सोडत” याचा अर्थ, चिटच्या कोणत्याही हप्त्याच्या वेळी बक्षिस मिळालेला वर्गणीदार निश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी चिट करारामध्ये विनिर्दिष्ट केलेली पद्धत, असा आहे ;

(ञ) “कार्यदेशक” याचा अर्थ, चिट करारानुसार जी चिटफंड चालविण्यास जबाबदार आहे अशी व्यक्ती, असा आहे व त्यात जी, कलम ३९ खालील कार्यदेशकाची कार्ये पार पाडते अशा कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो ;

(ट) “बक्षीस न मिळालेला वर्गणीदार” यात कसूरदार वर्गणीदाराचा अंतर्भाव होत नाही ;

(ठ) “विहित” याचा अर्थ, या अधिनियमाखाली तयार केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(ड) “बक्षिसाची रक्कम” याचा अर्थ, चिटची रक्कम व कसर यातील फरक आणि तिकिटाच्या एखाद्या भागाच्याबाबतीत चिटची रक्कम व तिकिटाच्या भागाच्या प्रमाणात असेल अशी कसर यातील फरक, असा आहे आणि, जेव्हा, बक्षिसाची रक्कम रोख रकमेव्यतिरिक्त अन्य रीतीने देय असेल तेव्हा, बक्षिसाच्या रकमेचे मूल्य हे, ती, ज्यावेळी देय असेल त्यावेळी तिचे जे मूल्य असेल तितके असेल ;

(ढ) “बक्षीस मिळालेला वर्गणीदार” याचा अर्थ, ज्याला एकतर बक्षिसाची रक्कम मिळाली आहे किंवा जो बक्षिसाची रक्कम मिळण्यास हक्कदार आहे असा वर्गणीदार, असा आहे ;

(ण) “निबंधक” याचा अर्थ, कलम ६१ अन्वये नियुक्त करण्यात आलेला चिटचा निबंधक, असा आहे व त्यात त्या कलमान्वये नियुक्त करण्यात आलेला अपर, सह, उप किंवा सहायक निबंधक यांचा अंतर्भाव आहे ;

(त) “रिझर्व्ह बँक” याचा अर्थ, भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम, १९३४ अन्वये घटित केलेली भारतीय रिझर्व्ह बँक, असा आहे ; **१९३४ चा २.**

(थ) “राज्य शासन” याचा संघ राज्यक्षेत्र या संदर्भातील अर्थ, संविधानाच्या अनुच्छेद २३९ अन्वये राष्ट्रपतींद्वारा नियुक्त करण्यात आलेल्या त्या संघ राज्यक्षेत्राचा प्रशासक, असा आहे ;

(द) “वर्गणीदार” यामध्ये तिकिटाचा भाग धारण करीत असेल अशी व्यक्ती आणि तसेच, लेखी अभिहस्तांकनाने किंवा कायद्याच्या प्रवर्तनाने तिकिट किंवा त्याच्या भागाची हस्तांतरिती यांचा अंतर्भाव असेल ;

(ध) “तिकिट” याचा अर्थ, चिटमधील वर्गणीदाराचा हिस्सा, असा आहे.

**अधिनियम अन्य कायदे, समयलेख, नियमावली इत्यादींवर अधिभावी असणे.**

**३.** या अधिनियमात, अन्यथा स्पष्टपणे तरतूद केलेली असेल ती खरेजी करून,—

(क) या अधिनियमाच्या तरतुदी, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यात किंवा संस्थापन समयलेख किंवा संस्थापन नियमावली किंवा उपविधी किंवा कोणताही करार यात किंवा या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी किंवा नंतर यथास्थिती, नोंदणी करण्यात, अंमलात आणण्यात किंवा संमत करण्यात आला असेल अशा कोणत्याही करारात किंवा ठरावात एतद्विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, परिणामक राहतील; आणि

(ख) पूर्वोक्त समयलेख, नियमावली, उपविधी, करार किंवा ठराव यात अंतर्भूत असलेली कोणतीही तरतूद, या अधिनियमाच्या तरतुदींना ती जितपत बाधक असेल तितपत शून्य होईल किंवा यथास्थिति, शून्य असेल.

प्रकरण दोन

## चिटची नोंदणी, चिटच्या व्यवसायाचा प्रारंभ व तो चालवणे

**४.** (१) ज्या राज्य शासनाच्या अधिकारक्षेत्रात चिट सुरू करावयाचा किंवा चालवावयाचा आहे त्या शासनाची, किंवा त्या शासनाने त्याबाबतीत अधिकार प्रदान केले असतील अशा अधिकाऱ्याची पूर्वमंजुरी घेतल्याखेरीज आणि या अधिनियमाच्या तरतुदीनुसार त्या शासनाकडे नोंदणी केलेली असल्याखेरीज कोणताही चिट सुरू करता किंवा चालवता येणार नाही : **अधिनियमान्वये मंजुरी न मिळालेल्या किंवा नोंदणीकृत नसलेल्या चिटला मनाई.**

परंतु असे की, या पोट-कलमान्वये मिळविण्यात आलेली मंजुरी, अशा मंजुरीच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या कालावधीत किंवा या बाबतीत अर्ज करण्यात आल्यावर राज्य शासन मुभा देईल अशा एकूण सहा महिन्यांपेक्षा अधिक होणार नाही अशा पुढील कालावधीमध्ये किंवा कालावधींमध्ये चिटची नोंदणी करण्यात न आल्यास, व्यपगत होईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये मंजुरी मिळवण्यासाठी करावयाचा अर्ज, कार्यदेशकाकडून, विहित अशा नमुन्यात व अशा रीतीने करण्यात येईल.

(३) पोट-कलम (एक) मध्ये निर्दिष्ट केलेली पूर्वमंजुरी, जर कार्यदेशक—

(क) या अधिनियमान्वये किंवा चिट व्यवसायाचे विनियमन करणाऱ्या अन्य कोणत्याही अधिनियमान्वये दोषसिद्ध ठरला असेल व अशा कोणत्याही अपराधासाठी त्याला कारावासाची शिक्षा झाली असेल; किंवा

(ख) या अधिनियमान्वये प्रदान करणे किंवा सादर करणे आवश्यक असलेल्या फीचे प्रदान करण्यात किंवा विवरणपत्र किंवा अभिलेख सादर करण्यात त्याने कसूर केली असेल किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचा किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांचा भंग केला असेल ; किंवा

(ग) कोणताही नैतिक अध:पतनाचा समावेश असलेल्या अपराधात तो दोषसिद्ध ठरला असेल व अशा कोणत्याही अपराधासाठी त्याला कारावासाची शिक्षा देण्यात आली असेल आणि जर त्याची सुटका झाल्यानंतर पाच वर्षांचा कालावधी लोटला नसेल, तर नाकारता येईल :

परंतु असे की, अशी मंजुरी नाकारण्यापूर्वी त्या कार्यदेशकाला त्याचे म्हणणे मांडण्यासाठी वाजवी संधी देण्यात येईल.

(४) या कलमान्वये पूर्वमंजुरी देणारा किंवा नाकारणारा राज्य शासनाचा आदेश, आणि पोट-कलम (५) च्या तरतुदींना अधीन राहून पोट-कलम (१) अन्वये अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याचा आदेश अंतिम असेल.

(५) पोट-कलम (१) अन्वये अधिकार प्रदान करण्यात आलेल्या अधिकाऱ्याने पूर्वमंजुरी नाकारल्यामुळे बाधित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला, असा नकार तिला कळवण्यात आल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत राज्य शासनकडे अपील करता येईल व अशा अपिलावरील त्या शासनाचा निर्णय अंतिम असेल.

**५.** कोणतीही व्यक्ती, कोणत्याही चिटच्या तिकिटांसाठी लोकांकडून वर्गणी मागण्यासाठी कोणतीही नोटीस, परिपत्रक, उद्देश पत्रके, प्रस्ताव किंवा इतर दस्तऐवज यांना कलम ४ अन्वये आवश्यक असेलेली पूर्वमंजुरी मिळाली आहे अशा निवेदनाचा व अशा मंजुरीच्या तपशिलांचा अंतर्भाव असल्याखेरीज अशी नोटीस, परिपत्रक, उद्देश पत्रके, प्रस्ताव किंवा एस्तऐवज काढणार नाही किंवा काढण्याची तजवीज करणार नाही. **विवक्षित अटींनुसार असेल त्याखेरीज वर्गणी मागण्यास मनाई.**

**६.** (१) प्रत्येक चिट करार हा दोन प्रतीत असेल आणि त्यावर प्रत्येक वर्गणीदाराची किंवा त्याने याबाबत लेखी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीची व कार्यदेशकाची सही असेल आणि तो किमान दोन साक्षीदारांनी साक्षांकित केलेला असेल आणि त्यात पुढील तपशील असेल :— **चिट कराराचा नमुना.**

(क) प्रत्येक वर्गणीदाराचे संपूर्ण नाव व निवासाचा पत्ता ;

(ख) प्रत्येक वर्गणीदाराकडे असलेल्या तिकिटांची, तिकिटांच्या भागासह, संख्या ;

(ग) हप्त्यांची संख्या, प्रत्येक तिकिटासाठीच्या प्रत्येक हप्त्याची रक्कम व अशा हप्त्यांच्या प्रदानामध्ये कोणतीही कसूर झाल्यास त्यावर देय होणारे व्याज किंवा शास्ती, काही असल्यास ;

(घ) चिटच्या प्रारंभाचा संभाव्य दिनांक व कालावधी ;

(ङ) प्रत्येक हप्त्याच्या वेळी बक्षीस मिळालेला वर्गणीदार ठरवण्याची रीत ;

(च) कोणत्याही हप्त्याच्या वेळी बक्षीस मिळालेल्या वर्गणीदाराने सोडून द्यावयाची कसरीची कमाल रक्कम ;

(छ) लाभांश, कार्यदेशकाची अडत किंवा पारिक्षमिक किंवा यथास्थिति, चिट चालविण्याचा खर्च यांच्या रुपात ज्या पद्धतीने व ज्या प्रमाणात कसर वितरीत करण्यात येईल ती पद्धत व प्रमाण ;

(ज) चिटची सोडत जेव्हा काढावयाची तो दिनांक, वेळ व ठिकाण ;

(झ) कार्यदेशकास ज्या हप्त्याच्या वेळी चिटची रक्कम मिळेल तो हप्ता ;

(ञ) या अधिनियमाच्या तरतुदींन्वये कार्यदेशक ज्या बँकेत चिटची रक्कम ठेव म्हणून ठेवील त्या मान्यताप्राप्त बँकेचे नाव ;

(ट) कार्यदेशक हा एखादी व्यक्ती असेल अशा बाबतीत जेव्हा अशी व्यक्ती मरण पावली असेल किंवा विकल मनाची झाली असेल किंवा अन्यथा असमर्थ झाली असेल तेव्हा ज्या रीतीने चिट चालवण्यात येईल ती रीत ;

(ठ) चिटच्या करारातील कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन झाले असेल अशा बाबतीत बक्षीस न मिळालेला किंवा बक्षीस मिळालेला वर्गणीदार किंवा कार्यदेशक ज्या परिणामास पात्र ठरेल ते परिणाम ;

(ड) एखादा वर्गणीदार ज्या अटींन्वये कसूरदार वर्गणीदार ठरेल त्या अटी ;

(ढ) कार्यदेशकाने देऊ करावयाच्या प्रतिभूतीचे स्वरुप व तपशील ;

(ण) कलम ४४ मध्ये अंतर्भूत असलेल्या ज्या तरतुदींना अधीन राहून कार्यदेशक बक्षीस न मिळालेल्या व बक्षीस न देण्यात आलेल्या वर्गणीदारांना चिटच्या अभिलेखांची तपासणी करण्यास मुभा देईल तो दिनांक व वेळ ;

(त) प्रत्येक वर्गणीदाराने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तींची नावे म्हणजेच, वर्गणीदाराचा मृत्यू झाल्यास किंवा जेव्हा तो अन्यथा करार करण्यास असमर्थ ठरेल तेव्हा वर्गणीदाराला चिटखाली उपर्जित होणारा लाभ ज्या व्यक्तींना देता येईल त्या व्यक्तींची नावे ;

(थ) त्या त्या वेळी विहित करण्यात येतील असे, कोणतेही इतर तपशील.

**स्पष्टीकरण.—**या पोट-कलमाच्या प्रयोजनासाठी कराराच्या स्वतंत्र प्रतींवर प्रत्येक वर्गणीदाराची सही घेतली तरी पुरेसे असेल.

(२) चिट सुरू केल्याच्या दिनांकपासून चिटचा कालावधी पाच वर्षांच्या पुढे वाढवता येणार नाही :

परंतु असे की, खालील बाबी विचारात घेता तसे करणे आवश्यक आहे. याबाबत राज्य शासनाचे समाधान झाले असेल तर, त्याला चिटचा कालावधी दहा वर्षे करण्यास परवानगी देता येईल.

(क) कार्यदेशकाची आर्थिक स्थिती ;

(ख) त्याची कार्यपद्धती ;

(ग) संभाव्य वर्गणीदारांचे हितसंबंध ;

(घ) प्रतिभूतीच्या बाबतीतील आवश्यकता ; आणि

(ङ) परिस्थिती नुसार आवश्यक अशा इतर बाबी.

(३) पोट-कलम १ च्या खंड (च) मध्ये निर्दिष्ट केलेली कसरीची रक्कम चिटच्या एकूण रकमेच्या [१][चाळीस टक्क्यांपेक्षा] अधिक असणार नाही.

(४) चिटच्या कोणत्याही हप्त्याच्यावेळी कोणत्या वर्गणीदाराला बक्षीस देण्यात यावे हे निश्चित करण्यासाठी लिलाव पद्धत आवश्यक असेल आणि एकापेक्षा अधिक व्यक्तींनी कसर रकमेची कमाल बोली केली असेल तर, त्या व्यक्तींमधून चिठ्ठ्या टाकून बक्षीस मिळालेला वर्गणीदार निश्चित करण्यात येईल.

---

१. सन २००१ चा अधिनियम क्रमांक १० कलम २ अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल केला.

**७.** (१) प्रत्येक चिट करार, कार्यदेशक दोन प्रतीत निबंधकाकडे दाखल करील. **चिट करार दाखल करणे.**

(२) निबंधक, चिट कराराची एक प्रत ठेवून घेईल आणि दुसरी प्रत चिट कराराची नोंदणी करण्यात आल्याबद्दलचे पृष्ठांकन करून कार्यदेशकास परत करील :

परंतु असे की, निबंधकाला खालीलपैकी कोणत्याही एका किंवा अधिक कारणांसाठी चिटची नोंदणी करण्याचे नाकारता येईल.—

(क) कार्यदेशकाकडून, कलम २० अन्वये देण्यात आलेली प्रतिभूती पुरेशी नाही ;

(ख) कार्यदेशक या अधिनियमान्वये किंवा चिटफंड व्यवसायाचे विनियमन करणाऱ्या अन्य कोणत्याही अधिनियमान्वये कोणत्याही अपराधासाठी दोषसिद्ध ठरलेला असेल व त्याला अशा कोणत्याही अपराधासाठी कारावासाची शिक्षा झालेली असेल ;

(ग) कार्यदेशकाने, या अधिनियमान्वये प्रदान किंवा दाखल करणे आवश्यक आहे अशा फीच्या प्रदानात किंवा कोणतेही विवरणपत्र किंवा अभिलेख दाखल करण्यात कसूर केली असेल किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांचे त्याने उल्लंघन केले असेल ;

(घ) कार्यदेशक नैतिक अधःपतनाचा समावेश असलेल्या कोणत्याही अपराधामध्ये दोषसिद्ध ठरलेला असेल व अशा कोणत्याही अपराधासाठी त्याला शिक्षा झाली असेल आणि जर त्याची मुक्तता होऊन पाच वर्षांचा कालावधी झालेला नसेल :

परंतु आणखी असे की, पहिल्या परंतुकान्वये चिटची नोंदणी करण्याचे नाकारण्यापूर्वी कार्यदेशकाला, त्याचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

(३) पोट-कलम (२) अन्वये करण्यात आलेले प्रत्येक पृष्ठांकन, या अधिनियमान्वये त्या चिटची रीतसर नोंदणी करण्यात आली आहे याचा निर्णायक पुरावा असेल आणि कलम ९ च्या पोट-कलम (१) अन्वये कार्यदेशकाकडून, अशा पृष्ठांकनाच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीत किंवा अशा पुढील कालावधीत किंवा या बाबतीत निबंधकाकडे करण्यात आलेल्या, अर्जावर, निबंधक मुभा देईल अशा एकूण तीन महिन्यांपेक्षा अधिक होणार नाही अशा आणखी कालावधीत प्रतिज्ञापन दाखल केले नाही तर, अशा चिटची नोंदणी संपुष्टात येईल.

(१९५६ चा १). **८.** (१) कंपनी अधिनियम, १९५६ यामध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, मात्र या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, कंपनीकडे, एक लाख रुपयांपेक्षा कमी नसेल एवढे भरणा झालेले भांडवल असल्याखेरीज, कंपनी चिट सुरू करणार नाही किंवा त्याचे कामकाज चालवणार नाही. **कंपनीने चिटचा प्रारंभ इत्यादीसाठी किमान आवश्यक भांडवल व राखीव निधी उभारणे.**

(२) या अधिनियमाच्या प्रारंभी एक लाख रुपयांपेक्षा कमी असेल इतके भरणा झालेले भांडवल असणारी आणि चिट व्यवसाय चालवणारी प्रत्येक कंपनी, अशा प्रारंभापासून तीन वर्षांचा कालावधी संपण्यापूर्वी आपले भरणा झालेले भाग भांडवल एक लाख रुपयांपेक्षा कमी नसेल इतके वाढवेल :

परंतु असे की, राज्य शासनाला, सार्वजनिक हिताच्या दृष्टीने किंवा कोणताही त्रास टाळण्यासाठी तसे करणे आवश्यक वाटले तर, कोणत्याही कंपनीच्या बाबतीत उक्त तीन वर्षांच्या कालावधीत आणखी वाढ करता येईल परंतु असा/असे वाढीव कालावधी एकूण दोन वर्षांपेक्षा अधिक असणार नाहीः/नाहीतः

परंतु आणखी असे की, अशा कोणत्याही कंपनीने आपल्या भरणा झालेल्या भांडवलात रुपये एक लाखांपेक्षा कमी नसेल इतकी वाढ केल्याखेरीज, ती कंपनी उक्त तीन वर्षांच्या कालावधीपेक्षा आणखी वाढ होईल अशा कालावधीत किंवा पहिल्या परंतुकान्वये अशा वाढीव कालावधीत किंवा कालावधीत कोणताही नवीन चिट सुरू करणार नाही.

(३) चिट व्यवसाय करणारी प्रत्येक कंपनी राखीव निधी उभारील व ठेवील, आणि प्रत्येक वर्षीच्या नफा तोटा लेख्यात उघड केलेल्या आणि तिच्या भागांवर कोणताही लाभांश घोषित करण्यापूर्वीच्या शिल्लक नफ्यापैकी त्या नफ्याच्या दहा टक्क्यांपेक्षा कमी असणार नाही इतकी रक्कम अशा राखीव निधीकडे हस्तांतरित करील.

(४) कोणतीही कंपनी, राखीव निधीतील कोणत्याही रकमेचे किंवा रकमांचे विनियोजन निबंधकाच्या पूर्व मान्यतेखेरीज करणार नाही आणि अशी मान्यता मिळवण्याच्या प्रयोजनासाठी निबंधकाकडे विहित नमुन्यात अर्ज करील व अशा अर्जात विनियोजनाबाबतच्या परिस्थितीचे स्पष्टीकरण देईल.

**चिट सुरू करणे.**

**९.** (१) प्रत्येक कार्यदेशक, चिट करारामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व तिकिटांची सर्व वर्गणी भरण्यात आल्यानंतर निबंधकाकडे तशा आशयाचे प्रतिज्ञापत्र सादर करील.

(२) पोट-कलम (१) अन्वये प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर निबंधक चिटच्या मंजुरीसाठी व नोंदणीसाठी आवश्यक सर्व गोष्टी आणि इतर बाबी यांचे योग्य अनुपालन झाले आहे याबाबत त्याचे समाधान झाल्यानंतर चिट सुरू करण्याबाबतचे प्रमाणपत्र कार्यदेशकाला देईल.

(३) पोट-कलम २ अन्वये, कार्यदेशकास, चिटफंड सुरू करण्यासंबंधातील प्रमाणपत्र प्राप्त झाल्याखेरीज, त्याला चिटफंडाचा कोणत्याही प्रकारे लिलाव करता किंवा सोडत काढता किंवा चिटफंडाच्या कोणत्याही रकमेचा विनियोग करता येणार नाही.

**वर्गणीदारांना द्यावयाच्या चिट कराराच्या प्रती .**

**१०.** (१) कलम ९, पोट-कलम (२) अन्वये कार्यदेशकाला, चिट सुरू करण्याबाबतचे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर शक्य तितक्या लवकर, परंतु, चिटच्या पहिल्या सोडतीच्या दिनांकानंतरची नसेल अशा वेळी, प्रत्येक वर्गणीदारास चिटच्या कराराच्या प्रमाणित सत्य प्रती पुरवील.

(२) कार्यदेशक, ज्या महिन्यात चिटच्या पहिल्या हप्त्यासाठी सोडत आयोजित करील तो महिना संपल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत निबंधकाकडे पोट-कलम (१) च्या तरतुदींचे अनुपालन करण्यात आले असल्याचे प्रमाणपत्र सादर करील.

**"चिट","चिटफंड", "चिट्टी" किंवा "कुरी" या शब्दांचा वापर.**

**११.** (१) कोणतीही व्यक्ती त्याच्या नावाचा भाग म्हणून "चिट", "चिट-फंड", "चिट्टी" किंवा "कुरी" यांपैकी कोणत्यातरी एका शब्दाचा वापर केल्याशिवाय चिट व्यवसाय करणार नाही आणि चिट करणाऱ्या व्यक्तीशिवाय अन्य कोणतीही व्यक्ती आपल्या नावाचा भाग म्हणून अशा कोणत्याही शब्दाचा वापर करणार नाही.

(२) या अधिनियमाच्या प्रारंभास—

(क) कोणतीही व्यक्ती, पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या शब्दाचा वापर, त्याच्या नावाचा भाग म्हणून न वापरता चिट व्यवसाय करीत असेल ; किंवा

(ख) कोणतीही व्यक्ती चिट व्यवसाय करीत नसताना, असा शब्द त्याच्या नावाचा भाग म्हणून वापरीत असेल अशा बाबतीत ;

अशा प्रारंभापासून एक वर्षाच्या कालावधीमध्ये, तो कोणताही असा शब्द त्याच्या नावाच्या भागात अंतर्भूत करील किंवा, यथास्थिती, असा शब्द त्याच्या नावामधून काढून टाकील :

परंतु असे की, राज्य शासनास, सार्वजनिक हिताच्या दृष्टीने किंवा कोणताही त्रास टाळण्यासाठी, आवश्यक वाटल्यास एक वर्षाचा उक्त कालावधी, एकूण एक वर्षाहून अधिक होणार नाही अशा कालावधीने किंवा कालावधींनी वाढवता येईल.

**कंपनीस चिट व्यवसायाव्यतिरिक्त इतर व्यवसाय करण्यास मनाई.**

**१२.** (१) राज्य शासनाच्या सर्वसाधारण किंवा विशेष परवानगीने असेल ते खेरीजकरून चिट व्यवसाय करणारी कोणतीही कंपनी कोणताही इतर व्यवसाय करणार नाही.

(२) या अधिनियमाच्या प्रारंभास, कोणतीही कंपनी चिट व्यवसायाव्यतिरिक्त कोणताही अन्य व्यवसायही करीत असेल तर, ती कंपनी अशा प्रारंभापासून तीन वर्षांचा कालावधी संपण्यापूर्वी, अशा इतर व्यवसायाचे समापन करील :

परंतु असे की, राज्य शासनास, सार्वजनिक हिताच्या दृष्टीने किंवा कोणताही त्रास टाळण्यासाठी, आवश्यक वाटल्यास तीन वर्षांचा उक्त कालावधी, एकूण दोन वर्षांहून अधिक नसेल अशा कालावधीने किंवा कालावधींनी, आणखी वाढवता येईल.

**चिटची एकूण रक्कम.**

**१३.** (१) भागीदारी संस्था किंवा इतर व्यक्तींचा संघ किंवा कंपनी किंवा सहकारी संस्था यांच्याव्यतिरिक्त असलेला कार्यदेशक, ज्याची चिटची एकूण रक्कम कोणत्याही वेळी [1](एक लाख) रुपयांपेक्षा जास्त असेल, असा चिट सुरू करणार नाही किंवा चालवणार नाही.

---

१. सन २००१ चा अधिनियम क्रमांक १०, कलम ३ (एक) अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल केला.

(२) कार्यदेशक ही भागीदारी संस्था किंवा इतर व्यक्तींचा संघ असेल तर, भागीदारी संस्था किंवा इतर संघाद्वारे चालविण्यात येणाऱ्या चिटची रक्कम कोणत्याही वेळी.

(क) भागीदारी संस्थेच्या भागीदारांची संख्या किंवा संघ घटित करणाऱ्या व्यक्तींची संख्या चारपेक्षा कमी नसेल तर, [१][सहा लाख] रुपये इतक्या रकमेपेक्षा;

(ख) इतर कोणत्याही बाबतीत, असा प्रत्येक भागीदार किंवा व्यक्ती यांच्या बाबतीत [२][एक लाख] रुपये या आधारे गणना करून येणाऱ्या रकमेपेक्षा ;

अधिक असणार नाही.

(३) कार्यदेशक ही कंपनी किंवा सहकारी संस्था असेल त्याबाबतीत, त्यांच्याद्वारे चालवण्यात येणाऱ्या चिटची एकूण चिट रक्कम, कोणत्याही वेळी कंपनी किंवा यथास्थिती, सहकारी संस्था यांच्या मालकीच्या निव्वळ निधीच्या दहापटीपेक्षा अधिक असणार नाही.

**स्पष्टीकरण**.—या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, "निव्वळ मालकी असलेला निधी", याचा अर्थ, कंपनी किंवा सहकारी संस्था यांच्या मागील लेखापरीक्षेतील ताळेबंदामध्ये दर्शविण्यात आल्याप्रमाणे, भरणा झालेले भांडवल व मुक्त राखीव निधी यांमधून, संचित शिल्लक तोटा, स्थगित महसूल, खर्च व इतर अमूर्त मत्ता, काही असल्यास अशा रकमा वजा करून उक्त ताळेबंदामध्ये दर्शविण्यात आलेली एकूण रक्कम, असा आहे.

**निधीचा वापर.**

**१४.** (१) चिट व्यवसाय करणारी कोणतीही व्यक्ती :—

(क) चिट व्यवसाय चालविणे ; किंवा

(ख) बक्षीस न मिळालेल्या वर्गणीदारांना, त्यानी भरलेल्या वर्गण्यांच्या प्रतिभूतीवर कर्जे व आगाऊ रकमा देणे ; किंवा

**१८८२ चा २.** (ग) भारतीय न्यास अधिनियम, १८८२ याच्या कलम २० च्या अर्थानुसार विश्वस्तव्यवस्थेच्या प्रतिभूतीमध्ये गुंतवणूक करणे ; किंवा

(घ) चिट करारपत्रात नमूद करण्यात आलेल्या मान्यताप्राप्त बँकामध्ये ठेवी ठेवणे ;

यांकरिता असेल ते खेरीज करून, अशा व्यवसायाच्या संबंधात (अशा व्यक्तीला देय असलेली अडत किंवा पारिश्रमिक किंवा कसूरदार वर्गणीदारांकडून प्राप्त झालेले व्याज किंवा शास्ती, कोणतीही असल्यास, वगळून) गोळा करण्यात आलेले पैसे वापरणार नाही.

(२) चिट व्यवसाय करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने, अशा व्यवसायाच्या संबंधात या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी, पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य कारणासाठी गोळा केलेल्या पैशांचा वापर केला असेल तर, तो, अशा प्रारंभापूर्वी जितके पैसे वसूल झाले नसतील तितके पैसे अशा प्रारंभापासून तीन वर्षांच्या कालावधीच्या समाप्तीपूर्वी वसूल करण्यात येतील हे निश्चित करील :

परंतु असे की, राज्य शासनास, सार्वजनिक हिताच्या दृष्टिकोनातून किंवा कोणताही त्रास टाळण्यासाठी, तसे करणे आवश्यक वाटल्यास त्याला तीन वर्षांचा उक्त कालावधी, एकूण एक वर्षाहून अधिक नसेल अशा कालावधीने किंवा कालावधींनी, वाढवता येईल.

**१५.** चिट करारपत्रात, कार्यदेशक व चिटचे सर्व वर्गणीदार यांच्या लेखी संमतीशिवाय, फेरफार करता येणार नाहीत, भर घालता येणार नाही किंवा ते रद्द करता येणार नाही. **चिट करारपत्रातील फेरफार.**

**१६.** (१) चिटची प्रत्येक सोडत, चिट करारपत्रात नमूद करण्यात आलेल्या दिनांकास, त्यावेळी व त्याठिकाणी आयोजित करण्यात येईल आणि त्यासाठीची नोटीस विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने, कार्यदेशकाकडून सर्व वर्गणीदारांना पाठवण्यात येईल. **चिट सुरू करण्याचा दिनांक, वेळ व ठिकाण.**

(२) अशी प्रत्येक सोडत चिट करारपत्राच्या तरतुदींनुसार व दोन पेक्षा कमी नसतील अशा वर्गणीदारांच्या उपस्थितीत काढण्यात येईल.

---

१. सन २००१ चा अधिनियम क्रमांक १० कलम ३ (दोन) (क) अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल केला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ३ (दोन) (ख) अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल केला.

(३) पोट-कलम (२) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, दोन वर्गणीदार उपस्थित नसल्यामुळे किंवा इतर कोणत्याही कारणासाठी कोणतीही सोडत काढण्यात आली नसेल तर, निबंधकाला स्वतःहून, किंवा कार्यदेशक किंवा कोणत्याही वर्गणीदाराने अर्ज केल्यावरून, असा निदेश देता येईल की, त्याच्या उपस्थितीत किंवा त्याने प्रतिनियुक्त केलेल्या व्यक्तीच्या उपस्थितीत सोडत काढण्यात येईल.

**कार्यवाहीचे कार्यवृत्त.**

**१७.** (१) प्रत्येक सोडतीच्या कार्यवाहीचे कार्यवृत्त तयार करण्यात येईल व सोडतीच्या समाप्तीच्या लगतनंतर, त्या प्रयोजनासाठी ठेवण्यात येत असलेल्या पुस्तकात, त्याची नोंद करण्यात येईल आणि त्यावर कार्यदेशक, बक्षीस मिळालेले वर्गणीदार उपस्थित असल्यास किंवा त्याचा प्राधिकृत एजंट व उपस्थित असलेले किमान दोन इतर वर्गणीदार यांची आणि कलम १६ च्या पोट-कलम (३) अन्वये निदेश देण्यात आलेले असतील तर, निबंधक किंवा या पोट-कलमाअन्वये त्यांने प्रतिनियुक्त केलेली व्यक्ती यांचीदेखील, सही असेल.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या कार्यवृत्तात,—

(क) कार्यवाही जेव्हा सुरू झाली व जेव्हा संपली तो दिनांक व वेळ आणि जेथे सोडत काढण्यात आली ते ठिकाण ;

(ख) कार्यवाहीशी संबंधित असलेल्या चिटच्या हप्त्यांची संख्या ;

(ग) उपस्थिती असलेल्या वर्गणीदारांची नावे ;

(घ) हप्त्यामधील बक्षिसाच्या रकमेसाठी पात्र झालेली किंवा झालेल्या व्यक्ती ;

(ङ) सूटची रक्कम ;

(च) कोणत्याही मागील हप्त्याच्या संबंधातील बक्षिसाची अदत्त रक्कम काही असल्यास, निकालात काढण्याच्या संबंधातील संपूर्ण तपशील ; आणि

(छ) विहित करण्यात येतील असे कोणतेही इतर तपशील ;

स्पष्टपणे नमूद केलेले असतील.

**निबंधकाकडे सादर करावयाच्या कार्यवृत्ताच्या प्रती.**

**१८.** कार्यदेशकाने कार्यवाहीच्या कार्यवृत्ताची खरी प्रत म्हणून, प्रमाणित केलेली प्रत्येक सोडतीच्या कार्यवृत्ताची प्रत ती ज्या सोडतीशी संबंधित असेल त्या सोडतीच्या दिनांकापासून एकवीस दिवसांच्या आत कार्यदेशकाकडून निबंधकाकडे सादर करण्यात येईल.

**व्यवसायाचे नवीन ठिकाण उघडण्यावर निर्बंध.**

**१९.** (१) चिट व्यवसाय करणारी कोणतीही व्यक्ती ज्याच्या प्रादेशिक अधिकारितेतील त्याचे नोंदणीकृत कार्यालय किंवा, यथास्थिति, व्यवसायाचे ठिकाण किंवा मुख्य ठिकाण आहे, अशा निबंधकाची पूर्वमान्यता मिळवल्याशिवाय, व्यवसायाचे नवीन ठिकाण उघडणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये मान्यता देण्यापूर्वी, निबंधक, ज्याच्या प्रादेशिक अधिकारितेत व्यवसायाचे नवीन ठिकाण उघडण्याचे प्रस्तावित केले असेल, त्या राज्याच्या निबंधकाशी विचारविनिमय करील व व्यवसायाचे नवीन ठिकाण सुरू केल्याने सार्वजनिक हित कितपत जपले जाईल व विहित करण्यात येतील अशा इतर बाबी कार्यदेशकाची वित्तीय स्थिती व प्रवर्तनाची पद्धतीही लक्षात घेईल.

(३) चिट व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीने, त्याचे नोंदणीकृत कार्यालय किंवा व्यवसायाचे ठिकाण किंवा प्रमुख ठिकाण जेथे आहे अशा राज्याव्यतिरिक्त, (यात यापुढे ज्याला मूळ राज्य असे निर्दिष्ट करण्यात आले आहे) अन्य राज्यामध्ये व्यवसायाचे नवीन ठिकाण सुरू केले असेल तर, जेथे व्यवसायाचे नवीन ठिकाण सुरू करण्यात आले आहे अशा राज्याचा निबंधकही अशा नवीन ठिकाणी सुरू केलेल्या चिट व्यवसायाच्या संबंधात मूळ राज्याचा निबंधक ज्या अधिकाराचा वापर करील, व जी कार्ये पार पाडील त्याच अधिकारांचा वापर करील व तीच कार्ये पार पाडील.

(४) या कलमाच्या प्रयोजनार्थ, "व्यवसायाचे ठिकाण" यांमध्ये कोणतेही शाखा कार्यालय, उप कार्यालय, किंवा जेथे अशा व्यक्तीकडून चिट व्यवसाय चालविण्यात येईल असे व्यवसायाचे कोणतेही ठिकाण, यांचा समावेश होतो.

## प्रकरण तीन

## कार्यदेशकाचे हक्क व कर्तव्ये

**२०.** (१) चिट योग्य प्रकारे चालविण्यासाठी, प्रत्येक कार्यदेशक, कलम ४ अन्वये पूर्वमंजुरीसाठी अर्ज करण्यापूर्वी— **कार्यदेशकाने द्यावयाची प्रतिभूती.**

[१][(क) निबंधकाच्या नावे—

(१) चिट रकमेच्या पन्नास टक्के रोख रक्कम मान्याताप्राप्त बँकेत, आणि

(२) मान्यताप्राप्त बँकेकडील बँक हमीच्या स्वरुपातील चिट रकमेच्या पन्नास टक्के इतकी रक्कम जमा करील ; किंवा ]

(ख) ज्यांचे दर्शनी मूल्य किंवा बाजार मूल्य यापैकी (जे कमी असेल ते) चिट रकमेच्या दिडपटीपेक्षा कमी असणार नाही इतक्या रक्कमेचे सरकारी रोखे निबंधकाच्या नावे हस्तांतरित करील ; किंवा

(ग) राज्य शासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात येईल अशा मूल्याच्या ज्यांमध्ये भारतीय न्यास अधिनियम, १८८२ याच्या कलम २० अन्वये विश्वस्तास पैसे गुंतवता येतील अशा प्रतिभूती असलेल्या इतर प्रतिभूती, निबंधकाच्या नावे हस्तांतरीत करील : (१८८२ चा २.)

परंतु असे की, खंड (ग) मध्ये विहित करण्यात आलेल्या प्रतिभूतींचे मूल्य, कोणत्याही बाबतीत, चिट रकमेच्या मुल्याच्या दीडपटीपेक्षा कमी नसेल.

(२) कार्यदेशक एकापेक्षा अधिक चिट चालवित असेल तर तो, पोट-कलम (१) च्या तरतुदींनुसार, प्रत्येक चिटच्या संबंधात प्रतिभूती पुरवील.

(३) निबंधकाला, चिटच्या चलनादरम्यान कोणत्याही वेळी, प्रतिभूतीच्या ऐवजी बदली प्रतिभूती ठेवण्यास परवानगी देता येईल ;

परंतु, असे की, बदली प्रतिभूतीचे दर्शनी मूल्य किंवा बाजार मूल्य (जे कमी असेल ते), पोट-कलम (१) अन्वये कार्यदेशकाद्वारे देण्यात आलेल्या प्रतिभूतीच्या मूल्याहून कमी नसेल.

(४) पोट-कलम (१) अन्वये कार्यदेशकाद्वारे देण्यात आलेली प्रतिभूती किंवा पोट-कलम (३) अन्वये देण्यात आलेली कोणतीही बदली प्रतिभूती चिट समाप्त होईपर्यंत व सर्व वर्गणीदारांच्या मागण्या निकालात काढेपर्यंत, हुकूमनाम्याद्वारे किंवा अन्य प्रकारे जप्त करण्यास पात्र असणार नाहीत.

(५) चिटची समाप्ती झाली असेल व वर्गणीदारांचे सर्व हक्कमागण्या निकालात काढल्या आहेत अशी निबंधकाची खात्री झाली असेल तर, तो कार्यदेशकाकडून पोट-कलम (१) अन्वये पुरविण्यात आलेली प्रतिभूती ; किंवा, यथास्थिति, पोट-कलम (३) अन्वये दिलेली बदली प्रतिभूती मुक्त करण्याचा आदेश देईल व असे करताना तो विहित करण्यात आले असेल अशा पद्धतीचे अनुसरण करील.

(६) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यात याविरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, या कलमान्वये देण्यात आलेल्या प्रतिभूती, जिच्याशी ती संबंधित आहे त्या चिटच्या चलनादरम्यान कार्यदेशक त्यांची देवाणघेवाण करणार नाही व कार्यदेशकाने, त्या संबंधात, हस्तांतरणाच्या मार्गाने कोणताही देवाणघेवाणीचा व्यवहार केला किंवा त्यावर इतर बोजा निर्माण केला तर तो रद्दबातल होईल.

**२१.** (१) कार्यदेशक,— **कार्यदेशकाचे हक्क.**

(क) चिट करारपत्रात एतद्‌विरुद्ध कोणतीही तरतूद नसेल तर, त्याने, चिटमधील तिकिटाची वर्गणी भरेलली असेल, या शर्तीस अधीन राहून, चिट करारपत्रात विनिर्दिष्ट करण्यात आलेली कसर वजा न करता पहिल्या हप्त्यात चिट रक्कम प्राप्त करण्यास हक्कदार असेल :

परंतु असे की, जेथे कार्यदेशकाने एकापेक्षा अधिक तिकिटांची वर्गणी भरली असेल त्याबाबतीत, तो चिटमधील एकापेक्षा अधिक चिटची रक्कम कसर न कापता, प्राप्त करण्यास पात्र असणार नाही ;

---

[१] सन २००१ चा अधिनियम क्रमांक १० कलम ४ द्वारे मूळ मजकुरा ऐवजी दाखल केला.

(ख) चिट करारपत्रात निश्चित करण्यात आली असेल त्याप्रमाणे, चिट रकमेच्या पाच टक्क्यांहून जास्त नसेल अशी रक्कम, अडत, परिश्रमिक किंवा चिट चालविण्याचा खर्च भागविण्यासाठी मिळण्यास हक्कदार असेल ;

(ग) हप्त्याचे प्रदान करण्यात कोणतीही कसूर केल्यावर देय असलेले व्याज व शास्ती, काही असल्यास, आणि चिट करारपत्राच्या तरतुदींअन्वये त्यास देय असतील अशा इतर रकमा यांना हक्कदार असेल ;

(घ) वर्गणीदारांकडून सर्व वर्गणींच्या रकमा प्राप्त करणे व वसुल करणे आणि बक्षीस मिळालेल्या वर्गणीदारांना बक्षिसाच्या रकमेचे वितरण करणे यास हक्कदार असेल ;

(ङ) बक्षीस मिळालेल्या वर्गणीदाराक्रडून, पुढील वर्गण्यांच्या देय होणाऱ्या रकमांबाबत पुरेशा प्रतिभूतीची मागणी करण्यास हक्कदार असेल.

**स्पष्टीकरण.—**या खंडाच्या प्रयोजनासाठी, प्रतिभूती, जर तिचे मूल्य बक्षीस मिळालेल्या वर्गणीदाराकडून देय रकमेच्या एक तृतीयांशाने अधिक असेल किंवा जर ती स्थावर मालमत्तेची बनलेली असल्यास, तिचे मूल्य अशा रकमेच्या अर्ध्यापेक्षा अधिक असेल तर, पुरेशी समजण्यात येईल.

(च) कसूरदार वर्गणीदारांच्या जागी बदली वर्गणीदार देण्यास हक्कदार असेल ; व

(छ) चिट रीतसर व योग्य प्रकारे चालविण्याकरिता आवश्यक असतील त्या इतर सर्व कृती करण्यास हक्कदार असेल.

(२) पोट-कलम (१) च्या खंड (ङ) अन्वये प्रतिभूती म्हणून देऊ केलेल्या मालमत्तेच्या मूल्याच्या संबंधात कोणताही विवाद उद्‌भवला तर, तो कलम ६४ अन्वये, लवादीसाठी निबंधकाकडे निर्दिष्ट करण्यात येईल.

**कार्यदेशकाची कर्तव्ये.**

**२२.** (१) कार्यदेशक, बक्षीस मिळालेल्या वर्गणीदाराने पुढील वर्गण्यांच्या देय रकमेसाठी पुरेशी प्रतिभूती पुरविल्यावर, त्यास बक्षिसाच्या रक्कमेचे प्रदान करण्यास बांधील असेल :

परंतु असे की, बक्षीस मिळालेल्या वर्गणीदाराने बक्षिसाच्या रकमेतून पुढील सर्व वर्गण्यांची रक्कम वजा करण्यास संमती दिली तर, तो कोणत्याही प्रतिभूतीशिवाय बक्षिसाची रक्कम देण्यास हक्कदार असेल व अशा प्रकरणात कार्यदेशक, बक्षीस मिळालेल्या वर्गणीदाराला सोडतीच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत किंवा अनुवर्ती हप्त्याच्या दिनांकापूर्वी, यांपैकी जो आधीचा असेल, त्या दिनांकास, बक्षिसाची रक्कम देईल :

परंतु आणखी असे की, पहिल्या परंतुकाअन्वये, बक्षीस मिळालेल्या वर्गणीदाराला रकमेचे प्रदान केले असेल तर, वजा करण्यात आलेली रक्कम, कार्यदेशक चिट करारनाम्यात नमूद करण्यात आलेल्या मान्यताप्राप्त बँकेत जमा करील, आणि अशा प्रकारे जमा करण्यात आलेली रक्कम, तो पुढील वर्गण्यांच्या प्रदानासाठी असेल त्याखेरीज काढणार नाही.

(२) जर बक्षीस मिळालेल्या वर्गणीदारांकडून देय रक्कम देण्यात कसूर झाल्यामुळे कोणत्याही सोडतीच्या बाबतीत बक्षिसाची देय रक्कम पुढच्या अनुवर्ती हप्त्याच्या दिनांकापर्यंत अदत्त राहिली असेल तर, कार्यदेशक, चिट करारपत्रामध्ये नमूद करण्यात आलेल्या मान्यताप्राप्त बँकेतील स्वतंत्र खात्यात, बक्षिसाची रक्कम तात्काळ जमा करील व अशी जमा केल्याची वस्तुस्थिती व त्याची कराणे, बक्षीस मिळालेल्या वर्गणीदाराला व निबंधकास लेखी कळवील :

परंतु असे की, कोणत्याही बक्षीस मिळालेल्या वर्गणीदाराने, सोडतीच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या कालावधीमध्ये चिटच्या कोणत्याही हप्त्याच्या संबंधात बक्षिसाची रक्कम गोळा केली नसेल तर, कार्यदेशकास, अशा हप्त्याच्या संबंधातील दुसरी सोडत काढण्याची मोकळीस असेल.

(३) पोट-कलम (१) अन्वये बक्षिसाची रक्कम किंवा पुढील वर्गण्यांची रक्कम यांचे प्रत्येक प्रदान आणि पोट-कलम (२) अन्वये बक्षिसाची जमा रक्कम, पुढच्या अनुवर्ती सोडतीच्या वेळी वर्गणीदारांना कळविण्यात येईल व अशा प्रदानाचा व ठेव रकमांचा तपशील, त्या सोडतीच्या कार्यवाहीच्या कार्यवृत्तामध्ये नोंदवण्यात येईल.

(४) कार्यदेशक कलम २१ च्या पोट-कलम (१) याच्या खंड (ख) किंवा खंड (ग) अन्वये, तो ज्याला हक्कदार आहे. त्याहून अधिक कोणत्याही रकमेचा स्वतःसाठी विनियोग करणार नाही :

परंतु असे की, कार्यदेशक, स्वतःच बक्षीस मिळालेला वर्गणीदार असेल तर, तो कलम ३१ च्या परंतुकांची पूर्तता करण्यास अधीन राहून बक्षीसाच्या रकमेचा स्वतःसाठी विनियोग करण्यास हक्कदार असेल :

परंतु आणखी असे की, पोट-कलम (१) च्या दुसऱ्या परंतुकाअन्वये जमा करण्यात आलेल्या रकमेवरील उपार्जित व्याजाचा विनियोग कार्यदेशकाला स्वतःसाठी करता येईल.

(५) कोणत्याही व्यक्तीला चिटचा वर्गणीदार म्हणून प्रवेश दिल्यामुळे जर चिट करारामध्ये, नमूद केलेल्या तिकिटांची एकूण संख्या वाढणार असेल तर, कार्यदेशक असा प्रवेश देणार नाही.

(६) कार्यदेशक, लाभांश, चिट करारानुसार रोखीने, धान्याच्या द्वारे किंवा पुढील हप्त्यांसाठी देय असलेल्या वर्गणीच्या समायोजनाच्या मार्गाने वर्गणीदारांमध्ये वितरित करील.

**२३.** कार्यदेशक, त्याच्या नोंदणीकृत कार्यालयात किंवा, यथास्थित, त्याच्या व्यवसायाच्या ठिकाणी किंवा मुख्य ठिकाणी किंवा जेथे, कार्यदेशकाचे कोणतेही शाखा कार्यालय, उप कार्यालय किंवा चिट व्यवसाय चालविण्यासाठीची व्यवसायाची कोणतीही जागा ही, ती त्याचे नोंदणीकृत कार्यालय किंवा त्याच्या व्यवसायाचे मुख्य ठिकाण असलेल्या राज्याव्यतिरिक्त अन्य राज्यात असेल तर, त्या राज्यात चालविलेल्या व्यवसायाच्या बाबतीत, अशा शाखा कार्यालयात, उप कार्यालयात किंवा व्यवसायाच्या ठिकाणी पुढील गोष्टी ठेवील :— **कार्यदेशकाने ठेवावयाची पुस्तके, अभिलेख इ.**

(क) (एक) प्रत्येक चिटमधील वर्गणीदाराचे नाव आणि पूर्ण तपशील, तसेच, प्रत्येक वर्गणीदाराने धारण केलेल्या तिकीटांचे क्रमांक ;

(दोन) वर्गणीदाराने चिट करारावर स्वाक्षरी केली त्याचा दिनांक ; आणि

(तीन) वर्गणीदाराने, तिकिटाचे अभिहस्तांकन केले असेल अशा बाबतीत, अभिहस्तांकनाच्या दिनांकासह अभिहस्तांकितीचे नाव व पूर्ण पत्ता आणि कार्यदेशकाने ज्या दिनांकास अभिहस्तांकनाला मान्यता दिली तो दिनांक,

यांचा अतंर्भाव असलेली नोदंवही ;

(ख) प्रत्येक सोडतीच्या कार्यवाहीच्या कार्यवृत्ताचा अंतर्भाव असलेले पुस्तक ;

(ग) (एक) बक्षिसप्राप्त वर्गणीदाराने प्रत्येक चिटमध्ये भरलेली रक्कम आणि अशा प्रदानाचे दिनांक ;

(दोन) बक्षीस मिळालेल्या वर्गणीदाराला देण्यात आलेली रक्कम आणि अशा प्रदानाचे दिनांक ;

(तीन) चिट करारात नमूद केलेल्या मान्यताप्राप्त बँकेतील कोणत्याही ठेवीच्या रकमेच्या बाबतीत, अशी रक्कम ठेव म्हणून ठेवल्याचा दिनांक व रक्कम ;

यांचा अतंर्भाव असलेली खातेवही ;

(घ) कार्यदेशकाकडून, त्याच्या कार्यालयात चालविण्यात येणाऱ्या सर्व चिटच्या बाबतीत, या अधिनियमाच्या तरतदींअन्वये आवश्यक असलेल्या मान्यताप्राप्त बँकेत ठेवलेल्या ठेवीच्या रकमा दर्शविणारी विहित नमुन्यातील नोंदवही ; आणि

(ङ) ज्या राज्य शासनाच्या अधिकार क्षेत्रात चिट चालविण्यात येतो त्याच्याकडून विहित करण्यात येतील अशा नमुन्यातील अशा अन्य नोंदवह्या आणि पुस्तके.

**१९५६ चा १.** **२४.** प्रत्येक कार्यदेशक, कंपनी अधिनियम, १९५६ याच्या तरतुदींना बाध न येता, प्रत्येक कॅलेंडर वर्षाच्या किंवा, यथास्थिति, कार्यदेशकाच्या वित्तीय वर्षाच्या अंतिम दिनांकाला असलेला ताळेबंद आणि लेखा वर्षाशी संबंधित नफातोट्याचा हिशेब, अनुसूचीच्या भाग-एक व दोन मध्ये तयार केलेल्या नमुन्यांमध्ये किंवा चिट व्यवसायाच्या बाबतीत त्या परिस्थितीत शक्य असेल त्या सारख्या नमुन्यात कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये लेखा परीक्षक म्हणून काम करण्याची अर्हता असलेल्या लेखापरीक्षकामार्फत किंवा कलम ६१ अन्वये नियुक्त केलेल्या चिट लेखापरीक्षकामार्फत लेखापरिक्षित करून विहित करण्यात येईल अशा वेळेत निबंधकाकडे सादर करील : **ताळेबंद.**

परंतु असे की, कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये अर्हताप्राप्त लेखापरीक्षकाकडून लेखापरीक्षित केलेल्या ताळेबंदाची, कलम ६१ अन्वये चिट लेखापरीक्षक म्हणून नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकाला, निबंधकाने याबाबतीत प्राधिकृत केले असेल तर कोणत्याही वेळी ताळेबंदाची लेखा परीक्षा करण्याचा अधिकार असेल. **१९५६ चा १.**

**वर्गणीदाराच्या बाबतीत कार्यदेशकाचे दायित्व.**

**२५.** (१) प्रत्येक कार्यदेशक, वर्गणीदारांच्या, त्याच्याकडून देय असलेल्या रक्कमांसाठी दायी असेल ;

(२) एखाद्या चिटमध्ये एका पेक्षा अधिक कार्यदेशक असतील अशा बाबतीत, त्यांच्यापैकी प्रत्येकाने संयुक्तपणे आणि पृथकपणे; आणि कार्यदेशक ही भागीदारी संस्था किंवा इतर व्यक्तींचा संघ असल्यास भागीदारातील प्रत्येक भागीदार किंवा व्यक्ती संयुक्तपणे आणि पृथकपणे आणि कार्यदेशक, ही कंपनी असल्यास, अशी कंपनी चिट मधून उद्‌भवणाऱ्या दायित्वाच्याबाबतीत वर्गणीदारांना दायी असेल.

**कार्यदेशकाचे माघार घेणे.**

**२६.** (१) कोणताही कार्यदेशक, किंवा चिटमध्ये एकापेक्षा अधिक कार्यदेशक असल्यास त्यापैकी कोणीही चिटच्या समाप्तीपर्यंत त्यांच्यामधून माघार घेणार नाही. मात्र सर्व बक्षीस न मिळालेल्या आणि बक्षीस देण्यात न आलेल्या वर्गणीदारांनी अशा माघारीला लेखी अनुमती दिली असेल आणि कलम ४१ अन्वये अशा अनुमतीची प्रत निबंधकाकाडे सादर करण्यात आली असेल ती बाब वगळून.

(२) चिटच्या कोणत्याही एका कार्यदेशकाने माघार घेतल्यास, कलम २० किंवा कलम ३१ अन्वये त्याने दिलेल्या प्रतिभूतीवर परिणाम होणार नाही.

## प्रकरण चार

## बक्षीस न मिळालेल्या वर्गणीदारांचे हक्क आणि कर्तव्ये

**बक्षीस न मिळालेल्या वर्गणीदारांनी वर्गणी देणे व पावत्या घेणे.**

**२७.** बक्षीस न मिळालेला प्रत्येक वर्गणीदार, चिट करारामध्ये, नमूद केलेल्या दिनांकास, वेळेस आणि ठिकाणी त्याच्याकडून देय होणाऱ्या वर्गणीचा प्रत्येक हप्ता देईल आणि अशा प्रदानाबाबत कार्यदेशकाकडून पावती मिळण्यास तो हक्कदार राहील.

**कसूरदार वर्गणीदारांना काढणे.**

**२८.** (१) कोणत्याही बक्षीस न मिळालेल्या वर्गणीदाराने चिट कराराच्या शर्तीनुसार त्याच्या वर्गणीचे प्रदान करण्यास कसूर केली तर, तो वर्गणीदारांच्या सूचीमधून त्याचे नाव काढून टाकण्यास दायी राहील आणि अशा काढून टाकण्याच्या दिनांकापासून चौदा दिवसांच्या आत कार्यदेशकाकडून कसूरदार वर्गणीदारांना काढून टाकल्याबाबतची लेखी नोटीस देण्यात येईल :

परंतु असे की, कसूरदार वर्गणीदाराला अशी नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत त्याने विहित करण्यात आलेल्या अशा दराने व्याजासह कसूर झालेल्या हप्त्याचे प्रदान केल्यास अशा वर्गणीदारांच्या सूचीमध्ये त्याचे नाव पुन्हा नोंदविण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या अशा प्रत्येक कसूरदार वर्गणीदाराची नोंद कार्यदेशकाकडून ठेवण्यात येत असलेल्या संबंधित पुस्तकात त्याच्या दिनांकासह घेण्यात येईल.

(३) कार्यदेशक, पोट-कलम (२) मध्ये, निर्दिष्ट केलेल्या नोंदीचा सत्यप्रत, काढून टाकल्याच्या दिनांकापासून चौदा दिवसांच्या आत निबंधकाकडे दाखल करील.

(४) वर्गणीदारांच्या सूचीमधून नाव काढून टाकण्यामुळे व्यथित झालेला कोणताही कसूरदार, वर्गणीदार त्याला काढून टाकल्याबाबतची नोटीस प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत ही बाब कलम ६४ अन्वये लवादीसाठी निबंधकाकडे निर्देशित करील.

**बदली वर्गणीदार.**

**२९.** (१) कार्यदेशकाला, कलम २८ च्या पोट-कलम (१) अन्वये ज्या कसूरदार वर्गणीदाराचे नाव काढण्यात आलेले आहे अशा वर्गणीदारांच्या ऐवजी सूचीमध्ये बदली अशा कोणत्याही व्यक्तीचे (या प्रकणात यापुढे त्याला बदली वर्गणीदार म्हणून संबोधण्यात येईल) नाव दाखल करता येईल.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रत्येक बदली वर्गणीदारांची कार्यदेशकाकडून संबंधित पुस्तकात त्याच्या दिनांकासह नोंद करण्यात येईल आणि त्या दिनांकापासून चौदा दिवसांच्या आत अशा नोंदीची सत्यप्रत कार्यदेशकाकडून, निबंधकाकडे दाखल करण्यात येईल.

**३०.** (१) कार्यदेशक, बदलीच्या दिनांकापूर्वीच्या कालावधीतील हप्त्यांबाबत बदली वर्गणीदारांकडून (कसूरदार वर्गणीदारांकडून देय थकित रकमेसह) देय असलेल्या व वसूल केलेल्या रकमेपैकी, कसूरदार वर्गणीदाराने भरलेली रक्कम वजा चिट करारात तरतूद करण्यात आली असेल अशी कसर याद्वारे येईल अशी रक्कम, लगतनंतरच्या हप्त्यांच्या दिनांकापूर्वी चिट करारामध्ये नमूद केलेल्या मान्यताप्राप्त बँकेतील स्वतंत्र ओळखण्याजोग्या खात्यावर जमा करील आणि अशा जमा रकमेची वस्तुस्थिती कसूरदार वर्गणीदार व त्याचप्रमाणे निबंधकास कळविण्यात येईल आणि कसूरदार वर्गणीदाराला प्रदान करण्यासाठी असेल त्या रकमेव्यतिरिक्त, अशा प्रकारे जमा करण्यात आलेली रक्कम काढण्यात येणार नाही. कसूरदार वर्गणीदाराला देय रक्कम.

(२) पोट-कलम (१) अन्वये जमा करण्यात आलेली रक्कम, कसूरदार वर्गणीदाराकडून जसजशी रकमेची मागणी करण्यात येईल तसतशी त्याला देण्यात येईल. कार्यदेशक, अशा प्रदानाखेरीज अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी जमा करण्यात आलेली रक्कम काढणार नाही.

(३) ज्या कोणत्याही कसूरदार वर्गणीदाराच्या ऐवजी, बदली वर्गणीदार चिट संपेपर्यंत दिलेला नसेल त्याला, चिट करारामध्ये त्यासाठी तरतूद करण्यात आली असेल अशा वजातींना अधीन राहून चिट समाप्तीच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत ती वर्गणी देण्यात येईल.

## प्रकरण पाच

## बक्षीस मिळालेल्या वर्गणीदारांचे हक्क आणि कर्तव्ये

**३१.** बक्षीस मिळालेला प्रत्येक वर्गणीदाराने, त्याला देय बक्षिसाच्या रकमेतून भविष्यकालीन सर्व वर्गणीच्या रकमा वजा करण्याची परवानगी दिली नाही, तर तो त्याच्या भविष्यकालीन सर्व वर्गण्यांच्या देय प्रदानांकरिता पुरेशी प्रतिभूती देईल आणि कार्यदेशक ती स्वीकारील आणि कार्यदेशक हाच बक्षीस मिळालेला वर्गणीदार असल्यास तो, भविष्यकालिन सर्व वर्गणीच्या देय प्रदानांसाठी निबंधकास समाधानकारक वाटेल अशी प्रतिभूती देईल. बक्षीस मिळालेल्या वर्गणीदाराने प्रतिभूती देणे.

**३२.** बक्षीस मिळालेला प्रत्येक वर्गणीदार त्याची वर्गणी नियमितपणे चिट करारात नमूद केलेल्या ठिकाणी, त्या दिनांकास व वेळेत भरील. परंतु तसे करण्यास त्याने कसूर केल्यास तो तात्काळ भविष्यकालीन सर्व वर्गणीचे एकत्रित प्रदान करण्यास पात्र ठरेल. बक्षीस मिळालेल्या वर्गणीदाराने नियमितपणे वर्गणी देणे.

**३३.** (१) कार्यदेशक, त्याने त्या आशयाची लेखी मागणी केल्याखेरीज कलम ३२ अन्वये बक्षीस मिळालेल्या कसूरदार वर्गणीदाराकडून एकत्रित प्रदानाची मागणी करण्यास हक्कदार असणार नाही. कार्यदेशकाने लेखी नोटिशीद्वारे भविष्यकालिन वर्गणींची मागणी करणे.

(२) जेथे बक्षीस मिळालेल्या कसूरदार वर्गणीदाराकडून भविष्यकालीन वर्गण्यांच्या एकत्रित प्रदानाबाबत कार्यदेशकाकडून या अधिनियमांन्वये विवाद निर्माण करण्यात आला असेल, आणि जर त्या वर्गणीदाराने कार्यदेशकाला त्या दिनांकापर्यंतची वर्गणीची थकबाकी आणि चिट करारामध्ये तरतूद करण्यात आलेल्या दराने व्याज आणि विविदाच्या अभिनिर्णयाचा खर्च, विवादाच्या सुनावणीसाठी जो दिनांक निश्चित करण्यात आला असेल त्या दिवशी किंवा तत्पूर्वी प्रदान केला असेल तर, निबंधक किंवा विवादाची सुनावणी करणारा त्याचा नामनिर्देशिती, यांना, त्याविरुद्ध कोणताही करार अस्तित्वात असला तरी, भविष्यकालीन वर्गणी, ती ज्यावेळी देय होईल अशा दिनांकास किंवा त्यापूर्वी कार्यदेशकास, प्रदान करण्यासंबंधीचे निदेश, वर्गणीदाराला देणारा आदेश, देता येईल; आणि वर्गणीदारांकडून असे प्रदान करण्यात कोणतीही कसूर झाली तर, कार्यदेशकास त्या आदेशाची अंमलबजावणी करताना सर्व भविष्यकालीन वर्गण्या, व्याज व कोणताही खर्च असल्यास तो त्या संदर्भात वर्गणीदाराकडून कोणतीही रक्कम पूर्वीच देण्यात आलेली असल्यास ती वजा करून वसूल करता येईल :

परंतु असे की, कोणताही असा वाद वचनचिठ्ठींवर असल्यास, अशा वचनचिठ्ठीत, वचनचिठ्ठिनुसार देय असलेली रक्कम ही चिट वर्गण्यांच्या प्रदानासाठी असल्याचे स्पष्टपणे नमूद करण्यात आले असल्याखेरीज या पोट-कलमाअन्वये, आदेश संमत करण्यात येणार नाही.

(३) प्रतिभूती म्हणून दिलेल्या मालमत्तेत किंवा तिच्या कोणत्याही भागात कोणत्याही व्यक्तीचे कोणतेही हितसंबंध असल्यास ती व्यक्ती पोट-कलम (२) अन्वये रकमेच्या प्रदानास हक्कदार असेल.

(४) कार्यदेशक, त्याने वसूल केलेल्या भविष्यकालीन वर्गणीच्या सर्व एकत्रित रकमा चिट करारात नमूद केलेल्या एखाद्या मान्यताप्राप्त बँकेत अनुवर्ती हप्त्यांच्या दिनांकापूर्वी भरणा करील आणि त्याने भरणा केलेली रक्कम, भविष्यकालीन वर्गण्यांच्या प्रदानाखेरीज अन्य कारणासाठी काढण्यात येणार नाही.

(५) कोणतीही मालमत्ता, भविष्यकालीन वर्गणीच्या एकत्रित प्रदानाच्या बदल्यात प्रतिभूती म्हणून प्राप्त केली असल्यास ती भविष्यकालीन वर्गणीच्या देय प्रदानाकरिता प्रतिभूती म्हणून राहील.

## प्रकरण सहा

## हस्तांतरणे

**कार्यदेशकाच्या हक्कांच्या हस्तांतरणावर निर्बंध.**

**३४.** (१) बक्षीस मिळालेल्या वर्गणीदाराकडून वर्णगी मिळविण्याच्या कार्यदेशकाच्या हक्कांचे हस्तांतरण, निबंधकाच्या लेखी पूर्व मंजुरीशिवाय करण्यात येणार नाही.

(२) बक्षीस मिळालेल्या वर्गणीदाराकडून वर्गणी मिळविण्याच्या कार्यदेशकाच्या हक्कांच्या कोणत्याही हस्तांतरणामुळे जर बक्षीस न मिळालेल्या किंवा मिळालेले बक्षीस प्रदान न करण्यात आलेल्या, वर्गणीदाराच्या हितसंबंधात बाधा किंवा विलंब होण्याची शक्यता असेल तर, अशा वर्गणीदाराच्या सांगण्यावरून ते हस्तांतरण शून्यवत करण्यात येईल.

(३) पोट-कलम (२) अन्वये वर्गणीदाराकडून हस्तांतरणाबाबत विवाद केला गेला असेल तेव्हा, हस्तांतरणाच्या वेळी कार्यदेशक पतदार स्थितीत होता आणि त्या हस्तांतरणामुळे अशा वर्गणीदाराच्या हितसंबंधात बाधा पोचणार नाही किंवा त्यास विलंब होणार नाही. याच्या शाबितीचा भार हस्तांतरितीचा असेल.

**बक्षीस न मिळालेल्या वर्गणीदाराच्या हक्काचे हस्तांकरण लेखी असणे.**

**३५.** बक्षीस न मिळालेल्या चिटमधील वर्गणीदाराच्या हक्कांचे प्रत्येक हस्तांतरण लेखी, कमीत कमी दोन साक्षीदारांनी यथोचितरीत्या साक्षांकित केलेले असेल आणि कार्यदेशकाकडे दाखल केलेले असेल.

**कार्यदेशकाने हस्तांतरणास मान्यता देणे.**

**३६.** कलम ३५ खालील प्रत्येक हस्तांतरण, कार्यदेशकाला हस्तांतरणाचा प्रस्ताव प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून चौदा दिवसांच्या कालावधीत त्याच्याकडून मान्य करण्यात येईल, मात्र हस्तांतरिती दिवाळखोर असेल किंवा या अधिनियमासह कोणत्याही कायद्याच्या तरतुदींना निष्प्रभ करण्याच्या हेतूने हस्तांतरण परिणामक करण्यात आले असेल ती बाब वगळण्यात येईल आणि कार्यदेशकाचा हस्तांतरण मान्य किंवा अमान्य करण्याचा निर्णय संबंधित पक्षकारांना तात्काळ कळविण्यात येईल.

**हस्तांतरणाची नोंद.**

**३७.** कलम ३४ किंवा ३५ खालील प्रत्येक हस्तांतरण कार्यदेशकाकडून चिटच्या नोंदवह्यांमध्ये तात्काळ नोंदविण्यात येईल आणि कार्यदेशक अशा नोंदीची सत्यप्रत अशी नोंद केल्याच्या दिनांकापासून चौदा दिवसांच्या आत निबंधकाकडे पाठवील.

## प्रकरण सात

## वर्गणीदारांच्या सर्वसदस्य मंडळाच्या बैठकी

**वर्गणीदारांच्या सर्वसदस्य मंडळांच्या बैठकी.**

**३८.** (१) कार्यदेशकाला, विशेष ठराव संमत करण्यासाठी कोणताही प्रस्ताव विचारात घेण्याकरिता स्वत:हून वर्गणीदारांच्या सर्वसदस्य मंडळाची विशेष बैठक बोलवता येईल.

(२) कार्यदेशक, बक्षीस न मिळालेल्या आणि बक्षीस न दिलेल्या वर्गणीदारांच्या पंचवीस टक्क्यांपेक्षा कमी नसतील इतक्या वर्गणीदारांच्या लेखी मागणीनुसार, अशी बैठक बोलावील, आणि अशा प्रकारे बोलावलेली बैठक, मागणीपत्र मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीत बोलावील आणि कार्यदेशकाने असे मागणीपत्र मिळाल्याच्या दिनांकापासून चौदा दिवसांच्या कालावधीत अशी बैठक बोलावण्यास नकार दिला किंवा तो अशी बैठक बोलावण्यात अपयशी ठरला तर, बक्षीस न मिळालेले व बक्षीस न दिलेले पंचवीस टक्क्यांपेक्षा कमी नसतील अशा वर्गणीदारांना याबाबत निबंधकाला वस्तुस्थितीची माहिती देणारी नोटीस देता येईल.

(३) निबंधक, पोट-कलम (२) अन्वये नोटीस प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून २१ दिवसांच्या कालावधीत वर्गणीदारांच्या सर्व-सदस्य मंडळाची विशेष बैठक बोलावील किंवा बैठक बोलावण्याबाबत निदेश देईल आणि असे निदेश मिळाल्यावर अशा निदेशाचे पालन करणे हे कार्यदेशकाचे कर्तव्य असेल.

(४) या कलमानुसार, सर्व वर्गणीदारांना, बैठकीचे उद्दीष्ट, दिनांक व वेळ आणि ठिकाण विनिर्दिष्ट करणारी नोटीस, १४ दिवसांपेक्षा कमी असणार नाही अशा कालावधीत देण्यात येईल आणि अशा बैठकीच्या नोटिशीसह, विशेष ठरावाची प्रत देखील पाठविण्यात येईल.

**स्पष्टीकरण.—**या कलमाच्या आणि कलम ३९ च्या प्रयोजनाकरिता, "विशेष ठराव" याचा अर्थ विशेषतः या प्रयोजनासाठी बोलावण्यात आलेल्या, वर्गणीदारांच्या सर्वसदस्य मंडळाच्या बैठकीत, चिटच्या बैठकीत व्यक्तिशः किंवा प्रतिनिधीमार्फत उपस्थित असलेल्या आणि बक्षीस न मिळालेल्या आणि न दिलेल्या सर्वसदस्यांच्या वर्गणीच्या तीन चतुर्थांश रकमेचे किंवा यथास्थिति, ग्रॅमच्या मूल्याचे, असल्यास, प्रतिनिधित्व करणाऱ्या दोन तृतीयांशापेक्षा कमी नसतील अशा वर्गणीदाराच्या बहुमताने संमत झालेला ठराव, असा आहे.

## प्रकरण आठ

## चिटची समाप्ती

**३९.** (१) कार्यदेशक, मृत्यू पावला असेल किंवा विकल मनाचा झाला असेल किंवा अन्यथा असमर्थ झाला असेल तर चिट कराराच्या तरतुदीनुसार चिट चालू राहील. विवक्षित प्रकरणांमध्ये चिट पुढे चालू ठेवण्याची तरतूद.

(२) एखादा कार्यदेशक नादार म्हणून अभिनिर्णीत करण्यात आला असेल किंवा त्याने कलम २६ नुसार चिट मधून माघार घेतली असेल, किंवा कोणत्याही हप्त्यापासून चिट चालविण्यात अपयशी ठरला असेल अशा बाबतीत, किंवा पुढे येणाऱ्या कोणत्याही हप्त्यापूर्वी विशेष ठरावानुसार मान्य करण्यात आलेल्या दिनांकास अशा ठरावाद्वारे ज्या एका किंवा अधिक अशा वर्गणीदारांना प्राधिकृत करण्यात आले असेल अशी व्यक्ती पुढे चिट चालविण्यासाठी चिट करारातील कोणत्याही तरतुदीच्या अभावी कार्यदेशकाची जागा घेईल आणि चिट चालू ठेवील किंवा चिट पुढे चालिवण्यासाठी इतर व्यवस्था करील.

**४०.** पुढील बाबतीत चिट समाप्त झाल्याचे मानण्यात येईल :— चिटची समाप्ती.

(क) चिट करारात त्याच्यासाठी विनिर्दिष्ट केलेला कालावधी समाप्त झाला असेल त्यावेळी सर्व वर्गणीदारांना देय असलेल्या रकमांचे संपूर्ण प्रदान करण्यात आले असेल ; किंवा

(ख) बक्षीस न मिळालेले आणि बक्षीस न देण्यात आलेले असे सर्व वर्गणीदार आणि कार्यदेशक यांनी चिटच्या समाप्तीसाठी लेखी संमती दिली असेल आणि कलम ४१ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे अशा लेखी संमतीची प्रत निबंधकाकडे दाखल करण्यात आली असेल ; किंवा

(ग) कार्यदेशक मरण पावला असेल किंवा विकल मनाचा झाला असेल किंवा अन्यथा असमर्थ झाला असेल आणि चिट कराराच्या तरतुदीनुसार चिट पुढे चालू ठेवण्यात आला नसेल :

परंतु असे की, कार्यदेशक हा भागीदारी संस्था असेल अशा बाबतीत तिचा एखादा भागीदार मरण पावला असेल किंवा विकल मनाचा झाला असेल किंवा अन्यथा असमर्थ झाला असेल तर चिट समाप्त झाला आहे असे मानण्यात येणार नाही आणि उर्वरित एक किंवा अनेक भागीदार, चिट करारात तद्‌विरुद्ध कोणत्याही तरतुदी नसतील तर चिट चालवील किंवा चालवतील.

**४१.** कलम २६ मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रत्येक अनुमतीची आणि कलम ४० च्या खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रत्येक संमतीची सत्यप्रत, अशी अनुमती किंवा संमती ज्या दिनांकास मिळाली असेल त्या दिनांकापासून १४ दिवसांच्या कालावधीत कार्यदेशक किंवा उर्वरित एक भागीदार किंवा यथास्थिति, अनेक भागीदार अशी अनुमती किंवा संमती निबंधकाकडे दाखल करील. अनुमती किंवा संमतीची प्रत निबंधकाकडे दाखल करावयाची.

**४२.** कलम ४० च्या खंड (क) आणि खंड (ख) यामध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रकरणाव्यतिरिक्त,— बक्षीस न मिळालेल्या वर्गणीदारांच्या वर्गण्या परत करणे.

(क) या अधिनियमात किंवा चिट करारात अन्यथा तरतूद केलेली नसेल तर, प्रत्येक बक्षीस न मिळालेला वर्गणीदार चिट समाप्तीच्या वेळी, त्याने कोणताही लाभांश, अर्जित केला असेल तर, त्यासाठी कोणत्याही वजातीशिवाय, त्याच्या वर्गणीची रक्कम परत मिळविण्यास हक्कदार असेल ;

परंतु असे की, कलम ३५ च्या तरतुदींनुसार बक्षीस न मिळालेल्या वर्गणीदाराचे हक्क ज्या व्यक्तीकडे हस्तांतरित करण्यात आले असतील, ती व्यक्ती तिच्या स्वतःच्या वर्गणी व्यतिरिक्त अशा बक्षीस न मिळालेल्या वर्गणीदाराने चुकती केलेली वर्गणी परत मिळण्यास या कलमात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या शर्तींना अधीन राहून हक्कदार असेल ;

(ख) चीट करारात मूलतः निश्चित केलेल्या दिनांकाच्या अगोदरच्या दिनांकाला चीट समाप्त झाल्यास, बक्षीस न मिळालेल्या वर्गणीदाराने आपल्या मागण्यांची दखल ज्या दिनांकास घेतली, त्या दिनांकाला ती मागणी उद्भवलेली आहे, असे मानले जाईल.

चिटच्या मत्तांवर वर्गणीदाराच्या प्रदानाचा प्रथम भार.

**४३.** चीट व्यवहाराच्या संबंधात कार्यदेशकाकडून वर्गणीदाराला देय असलेल्या कोणत्याही रकमेचा चीट मत्तेवर प्रथम भार राहील.

## प्रकरण नऊ

## दस्तऐवजांची तपासणी

कार्यदेशकाने चीट अभिलेखाची तपासणी करण्याची विवक्षित वर्गणीदारांना परवानगी देणे.

**४४.** प्रत्येक कार्यदेशक, चीट करारामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रुपये पाच पेक्षा, अधिक होणार नाही इतक्या फीचे प्रदान करण्यात आल्यावर बक्षीस न मिळालेल्या वर्गणीदारांना व रक्कम अदा न करण्यात आलेल्या वर्गणीदारांना, सर्व सोडतीच्या दिनांकाना किंवा चीट करारामध्ये त्यासाठी तरतूद करण्यात येईल अशा दिनांकांना आणि अशा वेळेस बक्षीस मिळालेल्या वर्गणीदारांकडून घेण्यात आलेली किंवा वर्गणीदार म्हणून कार्यदेशकांकडून देण्यात आलेली प्रतिभूती बंधपत्रे, दस्तऐवज, पावत्या व इतर अभिलेख आणि चिटविषयक सर्व अभिलेख व तसेच लेखा पुस्तके, पासबुके, ताळेबंद आणि नफा तोटा लेखे आणि चिटची प्रत्यक्ष वित्तीय स्थिती दर्शविणारे असे इतर अभिलेख यांची तपासणी करण्यासाठी वाजवी सुविधा पुरवील.

कार्यदेशकाकडून चीट अभिलेखांचे परिरक्षण.

**४५.** कार्यदेशक, चिटच्यासंबंधातील सर्व अभिलेख चिटच्या समाप्तीच्या दिनांकापासून आठ वर्षांच्या कालावधीकरिता सांभाळून ठेवील.

निबंधकाकडून चिटची पुस्तके व अभिलेख यांची तपासणी.

**४६.** (१) कंपनी अधिनियम, १९५६ याच्या कलम २०९ व २०९(क) च्या तरतुदींना बांध न आणता, निबंधक किंवा याबाबत राज्य शासनाने प्राधिकृत केलेला अधिकारी, नोटीस देऊन किंवा नोटीस न देता कार्यदेशकाच्या जागेत कोणत्याही कामाच्या दिवशी, आणि वेळेत चिटची पुस्तके व चीटचे सर्व अभिलेख यांची तपासणी करू शकेल आणि प्रत्येक कार्यदेशकाने आपल्या अभिरक्षेत किंवा अधिकारात असतील अशी सर्व पुस्तके व अभिलेख निबंधकाला किंवा अशाप्रकारे प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांला देणे आणि तो कार्यदेशकाकडे मागणी करील असे चिटच्या संबंधातील कोणतेही विवरणपत्र किंवा माहिती तो विनिर्दिष्ट करील अशा वेळेत त्यास पुरवणे हे त्याचे कर्तव्य असेल.

(२) निबंधक किंवा याबाबत राज्य शासनाने प्राधिकृत केलेला अधिकारी, कार्यदेशकाला सात दिवसांची लेखी नोटीस दिल्यानंतर तो मागणी करील अशी चिटची पुस्तके व अभिलेख नोटीशीत नमूद केलेल्या ठिकाणी व वेळी तपासणीसाठी त्याच्यासमोर सादर करण्याचा त्याला निदेश देऊ शकेल.

(३) पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) नुसार केलेल्या तपासणीअंती कोणतेही दोष आढळल्यास निबंधक असे दोष कार्यदेशकाच्या निदर्शनास आणून देऊ शकेल आणि तसेच आदेशात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीत दोष सुधारण्यासाठी त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी कार्यवाही करण्याचा कार्यदेशकास निदेश देणारा आदेश काढू शकेल.

(४) पोट-कलम (३) अन्वये काढण्यात आलेल्या आदेशात अंतर्भूत असलेल्या निदेशांचे पालन करणे प्रत्येक कार्यदेशकास बंधनकारक असेल.

चिटची पुस्तके व अभिलेख तपासण्याचा रिझर्व्ह बँकेचा अधिकार.

**४७.** (१) भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम, १९३४ च्या कलम ४५(ढ) च्या तरतुदी अन्वये कोणत्याही कार्यदेशकाची पुस्तके व अभिलेख यांची तपासणी करण्याच्या रिझर्व्ह बँकेच्या अधिकारांचा कलम ४६ मधील कोणत्याही गोष्टींमुळे बाध येते असे मानण्यात येणार नाही. १९३४ चा २.

(२) रिझर्व्ह बँकेला आवश्यक वाटल्यास ती, कार्यदेशकाच्या पुस्तकांच्या व अभिलेखांच्या तपासणीचा तिचा अहवाल किंवा तिच्या अहवालाचा कोणताही भाग याची प्रत आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी कार्यदेशकाला पाठवू शकेल.

(३) प्रत्येक कार्यदेशकास, पोट-कलम (२) अन्वये अहवाल किंवा त्याचा भाग मिळाल्यावर, याबाबतीत रिझर्व्ह बँकेकडून कोणतेही निदेश देण्यात आलेले असल्यास त्याचे अनुपालन करणे बंधनकारक असेल आणि तो, तसे फर्मावण्यात आलेले असल्यास, त्याने केलेल्या कार्यवाहीच्या संबंधात नियतकालिक अहवाल सादर करील.

(४) रिझर्व्ह बँक, कार्यदेशक कंपनी असल्यास, कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय किंवा कोणत्याही अन्य बाबतीत कार्यदेशकाच्या धंद्याचे ठिकाण किंवा मुख्य ठिकाण ज्या राज्य शासनाच्या अधिकारितेत असेल त्या राज्य शासनाकडेदेखील आवश्यक वाटेल अशा कार्यवाहीसाठी कार्यदेशकाच्या पुस्तकांच्या व अभिलेखांच्या तपासणीच्या अहवालाची प्रत पाठवू शकेल.

## प्रकरण दहा

## चिटचे समापन

**४८.** एखादा चिट,— ज्या परिस्थितीत चिट समापित करता येईल ती परिस्थिती.

(क) जर कलम ४० च्या खंड (ग) अन्वये चीट समाप्त करण्यात आलेला असेल ; किंवा

(ख) जर कार्यदेशकाने कलम २० मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या प्रतिभूतीच्या बाबतीत प्रतिभूतीच्या स्वरूपाला किंवा तिच्या मूल्याला विशेष करून हानी पोचवण्याचा हेतू असेल अशी कोणतीही कृती केलेली असेल ; किंवा

(ग) जर त्याने या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीअन्वये जमा करणे आवश्यक असलेली कोणतीही रक्कम जमा करण्यास कसूर केलेली असेल ; किंवा

(घ) कार्यदेशक, वर्गणीदारांच्या देय रकमा देण्यास असमर्थ आहे याबाबत निबंधकाची खात्री पटेल अशा प्रकारे सिद्ध झालेले असेल ; किंवा

(ङ) जर कार्यदेशकाकडून चिटच्या धंद्याच्या संबंधात वर्गणीदारास देय असलेल्या रकमांच्या संबंधात निबंधकाने त्याच्या बाजूने दिलेल्या आदेशावर काढण्यात आलेला अंमलबजावणी आदेश किंवा इतर आदेशिका संपूर्णतः किंवा अंशतः पूर्तता न केलेल्या स्थितीत परत आलेली असेल ; किंवा

(च) जर कोणत्याही बक्षीस मिळालेल्या वर्गणीदाराकडून प्रतिभूती घेण्याच्या बाबतीत कार्यदेशकाने लबाडी किंवा संगनमत केलेले आहे असे सिद्ध झालेले असेल ; किंवा

(छ) जर कार्यदेशकाने, एक वर्गणीदार म्हणून असलेल्या आपल्या अधिकारात भविष्यकाळातील वर्गणीसाठी, पुरेशी प्रतिभूती न देता बक्षिसाच्या रकमेचा विनियोग केलेला असेल तर ; किंवा

(ज) जर निबंधकाची चिटचे व्यवहार वर्गणीदारांच्या हितसंबंधांना बाधक ठरेल अशा रीतीने चालवले जात असल्याबाबत खात्री पटली असेल ; किंवा

(झ) जर चीट समापित करण्यात यावा हे योग्य व समन्याय असेल, तर ज्याच्या प्रादेशिक अधिकारितेत चिटची नोंदणी करण्यात आलेली असेल त्या निबंधकाकडून एकतर स्वतःहून किंवा कोणत्याही बक्षीस न मिळालेल्या किंवा मिळालेले बक्षीस प्रदान न करण्यात आलेल्या वर्गणीदाराने केलेल्या अर्जानुसार समापित केला जाऊ शकेल.

**स्पष्टीकरण.—**खंड (घ) च्या प्रयोजनाकरिता, कार्यदेशक वर्गणीदारांना देय असलेल्या रकमा देण्यास असमर्थ आहे किंवा काय हे निर्धारित करण्यासाठी निबंधक चिटच्या बाबतीतील त्याची आकस्मिक व भविष्यातील दायित्वे विचारात घेईल.

१९०८ चा ५. **४९.** चिटच्या समापनासाठी करावयाचा अर्ज हा, कोणत्याही बक्षीस न मिळालेल्या किंवा मिळालेले बक्षीस प्रदान न करण्यात आलेल्या वर्गणीदाराकडून, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ मध्ये निर्धारित केलेल्या रीतीने स्वाक्षरित व सत्यापित करून निबंधकाकडे सादर केलेल्या विनंतीअर्जाद्वारे करण्यात येईल आणि त्यात विहित करण्यात आलेल्या तपशिलांचा अंतर्भाव असेल : समापनासाठी अर्ज.

परंतु असे की, कलम ४८ च्या खंड (घ) किंवा खंड (झ) अन्वये चिटच्या समापनासाठी करावयाचा कोणताही अर्ज, तो अर्ज,—

(क) बक्षीस न मिळालेल्या आणि मिळालेले बक्षीस प्रदान न करण्यात आलेल्या सर्व वर्गणीदारांकडून वर्गणी देण्यात आलेल्या रकमेचा किंवा, यथास्थिति, धान्याच्या मूल्याच्या पंचवीस टक्क्यांपेक्षा कमी नसेल इतक्या रकमेचे किंवा मूल्याचे प्रतिनिधित्व करणारे बक्षीस न मिळालेले आणि मिळालेले बक्षिस प्रदान न करण्यात आलेले वर्गणीदार, कोणतेही असल्यास यांनी ; किंवा

(ख) ज्याच्या अधिकारितेत चीट सुरू झालेला आहे किंवा चालविला जात आहे त्या राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने,

सादर केलेला नसेल तर करता येणार नाही.

**स्पष्टीकरण—**परंतुकाच्या खंड (क) च्या प्रयोजनाकरिता तिकिटाच्या एखाद्या भागाचा वर्गणीदार हा अशा भागाच्या मर्यादेपर्यंतच केवळ वर्गणीदार असल्याचे समजण्यात येईल.

समापन कार्यवाहीला रोध करणे.

**५०.** कलम ४८ व ४९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, चिटच्या समापनासाठी केलेला कोणताही विनंती अर्ज ;

(क) जर कार्यदेशकाच्याविरुद्ध नादारीसंबंधातील कार्यवाही प्रलंबित असेल तर; किंवा

(ख) ज्या बाबतीत कार्यदेशक ही एक भागीदारी संस्था असेल त्याबाबतीत जर सर्व भागीदारांविरुद्ध किंवा त्या भागीदारांपैकी एक भागीदार वगळता सर्व भागीदारांविरुद्ध नादारीसंबंधातील कार्यवाही प्रलंबित असेल तर किंवा भागीदारी संस्थेच्या विसर्जनाची कार्यवाही प्रलंबित असेल तर; किंवा

(ग) ज्या बाबतीत कार्यदेशक ही एक कंपनी किंवा सहकारी संस्था असेल त्याबाबतीत अशी कंपनी किंवा सहकारी संस्था यांच्या समापनाची कार्यवाही प्रलंबित असेल तर ;

निबंधकाकडून विचारार्थ स्वीकारला जाणार नाही.

समापन आदेशाचा प्रारंभ व परिणाम.

**५१.** चिटच्या समापनासाठीचा आदेश ज्या वर्गणीदारांना कार्यदेशकाकडून रकमा देय असतील त्या सर्व वर्गणीदारांच्या बाजूने प्रवर्तित होईल आणि समापनासाठीचा अर्ज ज्या दिनांकाला सादर करण्यात आला असेल त्या दिनांकापासून त्याचा प्रारंभ झाल्याचे मानण्यात येईल.

व्यादेश.

**५२.** निबंधक, कार्यदेशकाच्या किंवा चिटच्या संबंधात ज्यास रकमा देय आहेत अशा कोणत्याही वर्गणीदाराच्या अर्जानुसार या अधिनियमानांन्वये चिटचे समापन करण्यासाठी असलेला अर्ज सादर करण्यात आल्यानंतर आणि अंतरिम प्रापकाच्या नियुक्तीचा किंवा चिटचे समापन करण्याचा आदेश काढण्यापूर्वी कोणत्याही वेळी निबंधकाला योग्य वाटेल अशा अटींवर कार्यदेशकाविरुद्ध त्याच्याकडून देय रकमांच्या वसुलीसाठी दाखल केलेल्या कोणत्याही अन्य कार्यवाहीस अवरोध करू शकेल.

निबंधकाचे अधिकार.

**५३.** निबंधक या प्रकरणाखालील अर्जाची सुनावणी केल्यानंतर तो अर्ज खर्चासह किंवा त्याशिवाय खारीज करू शकेल किंवा सशर्त किंवा विनाशर्त सुनावणी स्थगित करू शकेल किंवा अंतरिम किंवा त्याला योग्य वाटेल असा अन्य कोणताही आदेश देऊ शकेल.

निबंधकाकडे किंवा इतर व्यक्तीकडे चिटच्या मत्ता, निहित असणे.

**५४.** चिटचे समापन करण्याचा एखादा आदेश काढल्यावर, चिटच्या बाबतीत ज्या वर्गणीदारांना रकमा देय आहेत अशा वर्गणीदारांमध्ये वाटप करण्यासाठी, अशा चिटच्या संबंधातील चिटच्या सर्व मत्ता निबंधकाकडे किंवा त्याच्याकडून नियुक्त करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे निहित होतील.

समापन आदेश काढण्यात आल्यावर दावे इत्यादी तहकूब असणे.

**५५.** जेव्हा चीट समापनाचा आदेश दिलेला असेल किंवा एखादा प्रापक नियुक्त केलेला असेल, तेव्हा चिटचे समापन करणाऱ्या निबंधकाच्या परवानगीने आणि त्याच्याकडून लादण्यात येतील अशा अटींवर असेल त्याव्यतिरिक्त इतर बाबतीत, वर्गणीदाराकडून चिटच्या संबंधात त्यास देय असलेल्या रकमांच्या वसुलीसाठी कार्यदेशकाविरुद्ध कोणताही दावा किंवा अन्य कायदेविषयक कार्यवाही चालू ठेवण्यात येणार नाही किंवा सुरू करण्यात येणार नाही.

**५६.** चीट समापनाचा आदेश काढण्यात आल्यावर, निबंधक चिटच्या संबंधात त्याच्या पुस्तकात नोंद करील आणि आदेश काढण्यात आला आहे असे **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करील. समापनाच्या आदेशाची अधिसूचना.

**५७.** चिटचे समापन करण्याची कार्यवाही प्रलंबित असताना कार्यदेशकाला नादार म्हणून अभिनिर्णीत करण्यात आले असेल त्याबाबतीत किंवा कार्यदेशक भागीदारी संस्था असेल आणि सर्व भागीदारांना किंवा त्यापैकी एक भागीदार वगळून सर्व भागीदारांना नादार म्हणून अभिनिर्णीत करण्यात आलेले असेल त्याबाबतीत किंवा ज्या-बाबतीत कार्यदेशक एक कंपनी असेल आणि न्यायालयाकडून कंपनी समापित करण्याचा आदेश देण्यात आलेला असेल, त्याबाबतीत या प्रकरणाखालील समापनाची कार्यवाही बंद होईल आणि चिटच्या मत्तांचे वाटप, कलमे ४३ आणि ५२ यांच्या तरतुदींना अधीन राहून, नादारी न्यायालयाकडून किंवा यथास्थिति कंपनीचे समापन करणाऱ्या न्यायालयाकडून करण्यात येईल. कार्यदेशक इत्यादींच्या नादारी किंवा कंपनीचे समापना समापनाची कार्यवाही बंद होणे आणि अशा कार्यवाहीचे हस्तांतरण.

**५८.** (१) ज्याबाबतीत चिटचे समापन करण्यासाठी केलेला अर्ज खारीज करण्यात आलेला असेल आणि विनंतीअर्ज क्षुल्लक किंवा त्रासदायक आहे अशी निबंधकाची खात्री पटली असेल त्याबाबतीत तो, कार्यदेशकाच्या अर्जावरून, असा विनंतीअर्ज करण्यात आल्यामुळे आणि त्यावरील कार्यवाहीमुळे झालेला खर्च आणि क्षति या दाखल कार्यदेशकाला भरपाई म्हणून त्यास योग्य वाटेल अशी एक हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल इतकी रक्कम भरपाई म्हणून त्याला देण्याचा निवाडा विनंती अर्जदाराविरुद्ध देऊ शकेल, आणि अशी रक्कम तो निवाडा दिवाणी न्यायालयाचा हुकुमनामा होता असे समजून वसूल करता येईल. कार्यदेशकाला भरपाई देणे.

(२) पोट-कलम (१) अन्वये निवाडा करण्यात आल्यानंतर चिटचे कोणतेही समापन करण्याचा अर्जासंबंधातील भरपाईसाठीचा कोणताही दावा स्वीकारला जाणार नाही.

**५९.** चिटच्या समापनासाठी केलेल्या कोणत्याही कार्यवाहीतील निबंधकाच्या निर्णयामुळे किंवा आदेशामुळे व्यथित झालेला कार्यदेशक किंवा कोणताही वर्गणीदार किंवा कोणतीही अन्य व्यक्ती अशा निर्णयाच्या किंवा आदेशाच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत राज्य शासनाकडे अपील करू शकेल. अपील करण्याचा हक्क.

**६०.** (१) ज्याबाबतीत या अधिनियमान्वये चिटचे समापन करण्यास नकार देणारा आदेश काढण्यात आलेला असेल त्याबाबतीत, बक्षीस न मिळालेल्या वर्गणीदाराच्या संबंधात, असा अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून अशा आदेशाच्या दिनांकापर्यंत चीट निलंबनाधीन असल्याचे समजण्यात येईल आणि चिटच्या करारात काहीही अंतर्भूत असले तरी, समापनासाठी विनंतीअर्ज करण्यात आल्याच्या दिनांकास जो कसूरदार नव्हता असा बक्षीस न मिळालेला कोणताही वर्गणीदार अशा आदेशाच्या दिनांकास कसूरदार असल्याचे मानण्यात येणार नाही. मर्यादा.

(२) ज्याबाबतीत या अधिनियमांन्वये चिटचे समापन करण्यास नकार देणारा आदेश काढण्यात आलेला असेल त्याबाबतीत चिटचे समापन करण्यासाठी अर्ज करण्यात आला नसता तर जो कोणताही दावा किंवा अन्य कायदेविषयक कार्यवाही (ज्याच्या संबंधात न्यायालयाची परवानगी प्राप्त करण्यात आलेली आहे असा दावा किंवा अर्ज याच्याव्यतिरिक्त इतर) करण्यात किंवा दाखल करण्यात आली असेल अशा कोणत्याही दाव्यासाठी किंवा अन्य कायदेविषयक कार्यवाहीसाठी विहित करण्यात आलेल्या मर्यादेच्या कालावधीची संगणना करताना अर्ज सादर करण्याच्या दिनांकापासून चिटचे समापन करण्यास नकार देणाऱ्या आदेशाच्या दिनांकापर्यंतचा कालावधी वगळण्यात येईल.

(३) या प्रकरणामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे वर्गणीदाराच्या हक्कांना चिटच्या समापनासाठी केलेल्या कार्यवाहीमध्ये अंतिम लाभांशाची घोषणा केल्यानंतर त्यास देय असलेल्या रकमेपैकी कोणतीही शिल्लक रक्कम असल्यास त्या शिल्लक रकमेसाठी व्यक्तिशः कार्यदेशकाच्याविरुद्ध खटला भरण्याच्या हक्कास बाध येणार नाही आणि अशा कोणत्याही कार्यवाहीसाठी विहित केलेल्या मर्यादेच्या कालावधीची संगणना करताना चिटचे समापन करण्यासाठी अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून अंतिम लाभांश घोषित करण्याच्या दिनांकापर्यंतचा कालावधी वगळण्यात येईल.

## प्रकरण अकरा

## अधिकाऱ्यांची नियुक्ती व फीची उगराणी

निबंधक व इतर अधिकारी यांची नियुक्ती.

**६१.** (१) राज्य शासनास **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, चिट निबंधकाची आणि या अधिनियमाद्वारे किंवा तद्अन्वये निबंधकावर सोपविण्यात आलेली कर्तव्ये पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असतील इतक्या अप्पर, सह, उप आणि सहायक निबंधकाची नियुक्ती करता येईल.

(२) निबंधकास आवश्यक वाटत असेल त्याप्रमाणे किंवा या अधिनियमाद्वारे किंवा तद्अन्वये चीट निरीक्षक किंवा चीट लेखापरीक्षक यांच्यावर सोपवण्यात आलेली कर्तव्ये पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असतील इतक्या चीट निरीक्षकांची आणि चीट लेखापरीक्षकांची नियुक्ती करता येईल.

(३) चीटचे सर्व निरीक्षक व लेखापरीक्षक या अधिनियमांद्वारे किंवा तद्न्वये त्यांच्याकडे सोपवण्यात आलेली कर्तव्ये निबंधकाच्या सर्वसाधारण अधीक्षणाखाली व नियंत्रणाखाली पार पाडतील.

(४) कोणत्याही चिटचे लेखे व्यवस्थित ठेवले गेले नाहीत आणि अशा लेख्यांची लेखापरीक्षा करावी असे प्रबंधकाचे मत असेल तर, त्याने चीट लेखापरीक्षकांकडून अशा लेख्यांची लेखापरीक्षा करून घेणे विधिसंमत असेल.

(५) चीट लेखापरीक्षकांसमोर चिटच्या संबंधातील सर्व लेखे पुस्तके आणि अन्य अभिलेख सादर करणे, आवश्यक असेल अशी माहिती त्यास पुरविणे आणि चिटच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्याच्या बाबतीत आवश्यक आणि वाजवी असेल असे साहाय्य व सुविधा त्यास उपलब्ध करून देणे हे पोट-कलम (४) अन्वये ज्याच्या लेख्यांची लेखापरीक्षा चीट लेखापरीक्षकांकडून करण्यात यावयाची आहे त्या कार्यदेशकाचे कर्तव्य असेल.

(६) कार्यदेशक पोट-कलम (४) अन्वये चिटच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्यासाठी विहित करण्यात येईल अशी फी चीट लेखापरीक्षकाला देईल :

परंतु असे की, चिटच्या रकमेच्या प्रमाणानुसार निरनिराळ्या चिटसाठी फीच्या वेगवेगळ्या श्रेणी विहित करता येतील.

निबंधकाच्या कार्यालयातील दस्तऐवजांची तपासणी.

**६२.** चिटच्या कार्यदेशक किंवा चीट मधील कोणताही वर्गणीदार किंवा कोणताही कार्यदेशक किंवा वर्गणीदार यांचे वारस किंवा वैध प्रतिनिधी यांना विहित करण्यात येईल अशी फी देऊन—

(क) निबंधकाकडून ठेवण्यात आलेल्या संबंधित चिटच्या दस्तऐवजांची तपासणी करता येईल ; किंवा

(ख) कोणत्याही अशा दस्तऐवजाची किंवा अभिलेखाची प्रमाणित प्रत किंवा उतारा मिळविता येईल.

फीची उगराणी.

**६३.** (१) राज्य शासन वेळोवेळी,—

(क) कलम ४ अन्वये पूर्व मंजुरी देण्यासाठी ;

(ख) निबंधकाकडे चीट करार दाखल करून घेणे व कलम ७ अन्वये चिटची नोंदणी करण्यासाठी ;

(ग) निबंधकाकडे प्रतिज्ञापत्र दाखल करणे व कलम ९ अन्वये प्रारंभ प्रमाणपत्र देण्यासाठी ;

(घ) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीनुसार दस्तऐवजाच्या प्रती दाखल करण्यासाठी ;

(ङ) कलम ६१ अन्वये लेख्यांची लेखापरीक्षा करण्यासाठी ;

(च) कलम ६२ अन्वये दस्तऐवजांची तपासणी करण्यासाठी ;

(छ) कलम ६२ अन्वये दस्तऐवज व अभिलेख यांच्या प्रमाणित प्रती किंवा उतारे मिळवण्यासाठी ; आणि

(ज) राज्य शासनाला आवश्यक वाटतील अशा इतर बाबींसाठी ;

विहित करील अशी फी निबंधकास देण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये विहित केलेल्या फीचा तक्ता निबंधकाच्या कार्यालयात नोटीस फलकावर लावण्यात येईल.

## प्रकरण बारा

## विवाद व लवाद

**६४.** (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, चीट धंद्याच्या व्यवस्थापनाच्या संबंधातील कोणताही विवाद, त्यातील प्रत्येक पक्षकार हा पुढीलपैकी एक किंवा अन्य असेल तर, विवादातील पक्षकारांपैकी कोणत्याही पक्षकारांकडून लवादासाठी निबंधकाकडे सोपविण्यात येईल :— चिटच्या धंद्याच्या संबंधातील विवाद.

(क) चिटचा कार्यदेशक, बक्षीस मिळालेला वर्गणीदार किंवा बक्षीस न मिळालेला वर्गणीदार तसेच कसूरदार वर्गणीदार, भूतपूर्व वर्गणीदार किंवा वर्गणीदारांमार्फत किंवा मयत वर्गणीदारांमार्फत दावा सांगणारी व्यक्ती ;

(ख) वर्गणीदार, भूतपूर्व वर्गणीदार किंवा मयत वर्गणीदार यांचा जामीनदार.

**स्पष्टीकरण.—**या पोट-कलमाच्या प्रयोजनासाठी, चिटच्या धंद्याच्या व्यवस्थापनासंबंधातील विवादात पुढील बाबींचा समावेश असेल,—

(एक) वर्गणीदारांकडून कार्यदेशकाला देय असणारे किंवा त्यांच्याकडून वर्गणीदाराला, भूतपूर्व वर्गणीदाराला किंवा मयत वर्गणीदाराच्या नामनिर्दिष्ट व्यक्तीला, वारसाला किंवा कायदेशीर प्रतिनिधीला देय असणारे ऋण किंवा मागणी, मग असे ऋण किंवा मागणी स्वीकृत करण्यात आलेली असो वा नसो यासाठी कार्यदेशकाकडून किंवा त्याच्याविरुद्ध सांगण्यात आलेला दावा ;

(दोन) जामीनदाराने, कार्यदेशकाकडून देण्यात आलेल्या आणि मूळ कर्जादाराने कसूर केल्यामुळे जामीनदाराकडून वसूल करण्यात आलेल्या कर्जाच्या संबंधात मूळ कर्जदाराकडून त्यास देय असलेली कोणतीही रक्कम किंवा मागणी, मग अशी रक्कम किंवा मागणी स्वीकृत करण्यात आलेली असो वा नसो, यासाठी सांगितलेला दावा ; आणि

(तीन) वर्गणीदार, भूतपूर्व वर्गणीदार किंवा मयत वर्गणीदाराची नामनिर्दिष्ट व्यक्ती, वारस किंवा कायदेशीर प्रतिनिधी याने कार्यदेशकाला, अभिहस्तांकनाच्या शर्तीचा भंग करण्यात आल्यामुळे त्याने पुन्हा आपल्याकडे घेतलेली जमीन किंवा कोणतीही इतर मत्ता यांचा ताबा स्वाधीन करण्यास दिलेला नकार किंवा केलेली कसूर.

(२) निबंधकाच्या निवाड्यासाठी सोपविण्यात आलेली कोणतीही बाब ही पोट-कलम (१) च्या प्रयोजनासाठी विवाद आहे किंवा नाही असा कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास त्याबाबतीत निबंधकाकडून निर्णय करण्यात येईल व त्याचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

(३) कोणत्याही दिवाणी न्यायालयास, पोट-कलम (१) मध्ये निर्देश करण्यात आलेल्या कोणत्याही विवादाच्या संबंधात कोणताही दावा किंवा अन्य कार्यवाही स्वीकारण्याची अधिकारिता असणार नाही.

१९६३ चा **६५.** (१) मुदत अधिनियम, १९६३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु, या अधिनियमात समाविष्ट मुदत मर्यादा.
३६. केलेल्या विशिष्ट तरतुदींच्या अधीन राहून, कलम ६४ अन्वये निबंधकाकडे, निर्णयार्थ सोपवलेल्या विवादाच्या बाबतीत मुदत मर्यादा ही,—

(क) जर, विवाद मयत वर्गणीदाराकडून, कार्यदेशकाला देय असलेली कोणतीही रक्कम तसेच त्यावरील व्याज यांच्या वसुली संबंधातील असेल तर, असा वर्गणीदार ज्या दिनांकास मरण पावला असेल किंवा वर्गणीदार असल्याचे बंद झाला असेल, त्या दिनांकापासून संगणना करण्यात आलेली तीन वर्षे इतकी असेल ; किंवा

(ख) जर विवाद हा, कार्यदेशक आणि वर्गणीदार किंवा भूतपूर्व वर्गणीदार किंवा मयत वर्गणीदाराची नामनिर्देशित व्यक्ती, वारस किंवा वैध प्रतिनिधी यांच्यामधील असेल तर, आणि विवाद हा, विवादातील दोहोंपैकी कोणत्याही पक्षकाराने केलेली कृती किंवा अकृती यांच्या संबंधातील असेल तर, जिच्या संदर्भात विवाद उद्‌भवला असेल अशी कृती किंवा अकृती ज्या दिनांकास घडली त्या दिनांकापासून तीन वर्षे इतकी असेल.

(२) कलम ६४ अन्वये जे निर्णयार्थ निबंधकाकडे सोपवणे आवश्यक असेल अशा कोणत्याही पोट-कलम (१) मध्ये निर्देश करण्यात आलेल्या विवादांव्यतिरिक्त अन्य कोणत्याही विवादाच्या बाबतीत, मुदत मर्यादेचे नियमन, विवाद हा दावा होता आणि निबंधक हे दिवाणी न्यायालय होते असे समजून मुदत अधिनियम, १९६३ याच्या तरतुदींद्वारे करण्यात येईल. १९६३ चा ३६.

(३) पोट-कलम (१) व (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अर्जदाराने अशा मुदतीत विवाद निर्णयार्थ न सोपविण्यास त्यास पुरेसे कारण होते अशी निबंधकाची खात्री पटवून दिल्यास निबंधक, त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेली मुदत मर्यादा संपल्यानंतर देखील विवाद दाखल करून घेऊ शकेल.

विवाद मिटवणे.

**६६.** (१) निबंधकाकडे सोपविण्यात आलेली किंवा त्याच्या निदर्शनास आणून देण्यात आलेली कोणतीही बाब कलम ६४ च्या अर्थांतर्गत विवाद आहे अशी त्याची खात्री पटली तर, तो विहित करण्यात येईल अशा नियमांच्या अधीन राहून स्वतः मिटवील किंवा त्याच्याकडून नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीकडे (या प्रकरणात यापुढे जिचा नामनिर्दिष्ट व्यक्ती म्हणून निर्देश करण्यात आला आहे) तो निकालात काढण्यासाठी निर्देशित करील.

(२) ज्या बाबतीत पोट-कलम (१) अन्वये, कोणताही विवाद मिटवण्यासाठी नामनिर्दिष्ट व्यक्तीकडे सोपविण्यात आला असेल त्या बाबतीत, निबंधक लेखी नमूद करावयाच्या कारणांसाठी कोणत्याही वेळी असा विवाद नामनिर्दिष्ट व्यक्तीकडून काढून घेऊन शकेल आणि स्वतः तो विवाद मिटवेल किंवा तो पुनः मिटवण्यासाठी त्याच्याकडून नियुक्त करण्यात आलेल्या कोणत्याही अन्य नामनिर्दिष्ट व्यक्तीकडे सोपवू शकेल.

विवाद मिटवण्याची कार्यवाही आणि निबंधक किंवा नामनिर्दिष्ट व्यक्ती यांचे अधिकार.

**६७.** (१) कलम ६६ अन्वये, विवादाची सुनावणी करणाऱ्या निबंधकाला किंवा नामनिर्दिष्ट व्यक्तीला त्या कलमान्वये त्याला प्रदान केलेल्या अधिकारांखेरीज खालील बाबींच्या संबंधात, जे अधिकार दिवाणी न्यायालयाकडे, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ नुसार दाव्याची न्यायचौकशी करताना, निहित करण्यात आलेले असतात तेच अधिकार असतील,— १९०८ चा ५.

(क) व्यक्तींना उपस्थित राहण्यास आणि हजर राहण्यास भाग पाडणे, समन्स पाठविणे आणि त्यांची शपथेवर तपासणी करणे ;

(ख) आवश्यक दस्तऐवजांचा शोध घेण्यास आणि त्यांची तपासणी करण्यास भाग पाडणे ;

(ग) शपथपत्रावर साक्षीपुरावा मिळवणे ;

(घ) कोणतेही न्यायालय किंवा कार्यालय यांच्याकडून त्यांचे सरकारी अभिलेख किंवा त्यांच्या प्रती मागवणे ;

(ङ) साक्षीदार किंवा दस्तऐवज यांच्या तपासणीसाठी आयोगपत्र काढणे, आणि

(च) विहित करण्यात येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(२) निबंधक किंवा नामनिर्दिष्ट व्यक्ती यांच्या परवानगी शिवाय विधि व्यावसायिकाद्वारे, विवादाच्या सुनावणीच्या वेळी कोणत्याही पक्षकाराचे प्रतिनिधित्व करण्यात येणार नाही.

(३) (क) निबंधक किंवा नामनिर्दिष्ट व्यक्ती याची कोणत्याही व्यक्तीने मग तो वर्गणीदार असो किंवा नसो, विवादात पक्षकार आहेत अशा कोणत्याही व्यक्तीचा मालमत्तेतील कोणताही हितसंबंध संपादित केलेला आहे अशी खात्री पटली असेल तर तो, ज्या व्यक्तीने मालमतेतील हितसंबंध संपादित केलेला आहे त्या व्यक्तीला विवादातील एक पक्षकार म्हणून संलग्न करून घेता असा आदेश देऊ शकेल आणि निबंधक किंवा नामनिर्दिष्ट व्यक्ती यांच्याकडून विवादावर जो कोणताही निर्णय देण्यात येईल तो अशाप्रकारे संलग्न झालेल्या पक्षकारावर तो जणू काही विवादाचा मूळ पक्षकार होता असे समजून, बंधनकारक असेल ;

(ख) ज्या बाबतीत विवाद चुकीच्या व्यक्तीच्या नावाने निर्देशिलेला असेल किंवा ज्या बाबतीत सर्व आवश्यक पक्षकार समाविष्ट करण्यात आलेले नसतील त्याबाबतीत, असे खऱ्याखुऱ्या चुकीमुळे झालेले होते अशी निबंधकाची किंवा नामनिर्दिष्ट व्यक्तीची खात्री पटली असेल तर, तो योग्य वाटेल अशा शर्तीवर, विवादाच्या सुनावणीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही अन्य व्यक्तींस विवादातील पक्षकार म्हणून, मूळ व्यक्तीऐवजी समाविष्ट करण्याचा किंवा जादा समाविष्ट करण्याचा आदेश देऊ शकेल.

(ग) निबंधक किंवा नामनिर्दिष्ट व्यक्ती, कोणत्याही पक्षकाराने अर्ज केलेला असताना किंवा नसताना कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर निबंधक किंवा नामनिर्दिष्ट व्यक्ती यांस योग्य वाटेल अशा अटींवर, अयोग्यपणे संलग्न झालेल्या कोणत्याही पक्षकाराचे नाव काढून टाकण्यात यावे असा आदेश देऊ शकेल.

(घ) विवादाचा पक्षकार असलेली आणि वादकारणाच्या संबंधात एकापेक्षा अधिक अनुतोषास पात्र असलेली कोणतीही व्यक्ती अशा सर्व किंवा कोणत्याही अनुतोषाची मागणी करू शकेल, परंतु तिने कोणत्याही अशा अनुतोषाची मागणी केली नाही तर निबंधकाच्या किंवा नामनिर्दिष्ट व्यक्तीच्या परवानगीने असेल त्याव्यतिरिक्त इतर बाबतीत, तो त्या अनुतोषाची मागणी करण्यास पात्र असणार नाही.

**६८.** (१) ज्या बाबतीत कलम ६४ अन्वये विवाद सोपविण्यात आलेला असेल आणि विवादाची सुनावणी करणारा निबंधक किंवा नामनिर्दिष्ट व्यक्ती यांची अशा विवादाचा पक्षकार कोणत्याही निवाड्याची अंमलबजावणी किंवा काढण्यात येईल अशा कोणत्याही आदेशाची अंमलबजावणी विफल करण्याच्या किंवा तीमध्ये अडथळा आणण्याच्या इराद्याने–

न्यायनिर्णय आणि इतर वादकालीन आदेश यांच्यापूर्वी जप्ती.

(क) त्याची संपूर्ण मालमत्ता किंवा तिचा कोणताही भाग निकालात काढण्याच्या बेतात आहे किंवा,

(ख) निबंधकाच्या अधिकारीतेमधून संपूर्ण मालमता किंवा तिचा कोणताही भाग हलविण्याच्या बेतात आहे, अशी चौकशीअंती किंवा अन्यथा खात्री पटली असेल तर,

तो, पुरेशी प्रतिभूती देण्यात आलेली नसेल तर, उक्त मालमत्तेच्या सशर्त जप्तीचा निदेश देऊ शकेल आणि ती, जणू काही ती सक्षम दिवणी न्यायालयाकडून करण्यात आलेली आहे असे समजून त्याप्रमाणे अंमलात येईल.

(२) ज्याबाबतीत पोट-कलम (१) अन्वये, निबंधकाने किंवा नामनिर्दिष्ट व्यक्तीने, कोणतीही मालमत्ता जप्त करण्याचा निदेश दिलेला असेल त्या बाबतीत तो ज्या व्यक्तीची मालमत्ता अशाप्रकारे जप्त करण्यात आली असेल त्या व्यक्तीला, त्यास पुरेशी वाटेल अशी प्रतिभूती विनिर्दिष्ट कालावधीत देण्यास फर्मावणारी नोटीस काढील आणि त्या व्यक्तीने अशी प्रतिभूती देण्यास कसूर केली तर, निबंधक किंवा नामनिर्दिष्ट व्यक्ती आदेश कायम करू शकेल आणि विवादाच्या निर्णयानंतर, निवाडा देण्यात आला असेल तर, हक्कमागणीबाबत अशाप्रकारे जप्त करण्यात आलेली मालमत्ता निकालात काढण्याचा निदेश देऊ शकेल.

(३) ह्या कलमान्वये केलेल्या कोणत्याही जप्तीमुळे, विवादात पक्षकार नसतील अशा व्यक्तींच्या, मालमत्ता जप्त केली जाण्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या हक्कांना बाध येणार नाही किंवा ज्या व्यक्तीची मालमत्ता अशाप्रकारे जप्त करण्यात आली आहे अशा व्यक्तीविरुद्ध हुकूमनामा धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, जप्ती अधीन असलेल्या मालमत्तेची विक्री करण्यासाठी असा हुकूमनामा लागू करण्यास आडकाठी येणार नाही.

(४) निबंधक किंवा नामनिर्दिष्ट व्यक्ती, न्यायाची उद्दिष्ट विफल केली जाण्यास प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने पोट-कलम (१) मध्ये निर्देश करण्यात आलेल्या विवादामध्ये निवाडा प्रलंबित असताना न्याय्य व सोयीस्कर वाटतील असे वादकालिन आदेश देऊ शकेल.

**६९.** या प्रकरणा अन्वये विवाद लवादाकडे सोपवण्यात आला असेल तेव्हा, निबंधक किंवा नामनिर्दिष्ट व्यक्ती विवादातील पक्षकारांना सुनावणीची वाजवी संधी दिल्यानंतर, कार्यवाहीच्या संबंधात विवादातील पक्षकाराकडून करण्यात आलेला खर्च आणि निबंधकास किंवा नामनिर्दिष्ट व्यक्तीस देय असलेली फी आणि खर्च यासंबंधात, विवादावर निवाडा देईल आणि निबंधकाकडून विवादाचा निर्णय देण्यासाठी निश्चित केलेला कालावधी कोणताही असल्यास, समाप्त झाल्यानंतर तो करण्यात आला होता, केवळ याच कारणामुळे असा निवाडा विधिअग्राह्य ठरणार नाही आणि तो कलम ७० अन्वये अपील करण्याच्या अधीन राहून, अंतिम असेल व विवादाच्या पक्षकारांवर बंधनकारक असेल.

निबंधक किंवा नामनिर्दिष्ट व्यक्ती यांचा निर्णय.

**७०.** कलम ६९ अन्वये निबंधकाने किंवा नामनिर्दिष्ट व्यक्तीने काढलेला कोणताही आदेश किंवा निबंधकाचा किंवा नामनिर्दिष्ट व्यक्तीचा निवाडा यामुळे व्यथित झालेला कोणताही पक्षकार राज्य शासनाकडे, आदेशाच्या किंवा निवाड्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या कालावधीत अपील करू शकेल.

निबंधकाच्या किंवा नामनिर्दिष्ट व्यक्तीच्या निर्णयाविरुद्ध अपील.

**७१.** कोणत्याही पैशाचे प्रदान करण्यासाठी, कलम ६८ किंवा ६९ अन्वये निबंधकाकडून किंवा नामनिर्दिष्ट व्यक्तीकडून काढण्यात आलेला प्रत्येक आदेश आणि कलम ७० अन्वये अपिलात राज्य शासनाने काढलेला प्रत्येक आदेश यांचे पालन करण्यात आले नाही तर,—

पैसे कसे वसूल करावयाचे.

(क) निबंधकाने दिलेल्या प्रमाणपत्रानुसार दिवाणी न्यायालयाचा हुकूमनामा समजण्यात येईल आणि अशा न्यायालयाचा हुकूमनामा असल्याप्रमाणे त्याच रीतीने त्याची अंमलबजावणी करण्यात येईल किंवा ;

(ख) जमीन महसुलाची थकबाकी म्हणून रकमांची वसुली करण्यासाठी, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींनुसार त्याची अंमलबजावणी करण्यात येईल :

परंतु असे की, आदेशामध्ये निश्चित केलेल्या दिनांकापासून आणि असा दिनांक निश्चित करण्यात आला नसल्यास, आदेशाच्या दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर खंड (ख) अन्वये अंमलबजावणी करण्यासाठी कोणताही अर्ज करण्यात येणार नाही.

प्रमाणपत्र देण्यात आल्यानंतर मालमत्तेचे खाजगी हस्तांतरण कार्यदेशकाच्या विरुद्ध शून्यवत असणे.

**७२** कलम ७१ अन्वये निबंधकाकडून प्रमाणपत्र देण्यात आल्यानंतर मालमत्तेचे करण्यात आलेले कोणतेही खाजगी हस्तांतरण किंवा सुपूर्दगी किंवा तिच्यावर करण्यात किंवा निर्माण करण्यात आलेला बोजा किंवा भार, ज्याच्या अर्जावरून उक्त प्रमाणपत्र देण्यात आले होते त्या कार्यदेशकाच्या विरुद्ध शून्यवत असेल.

## प्रकरण तेरा

## **संकीर्ण**

रिझर्व्ह बँकेची सल्लागार म्हणून भूमिका.

**७३.** रिझर्व्ह बँक, कोणत्याही राज्य शासनाला, या अधिनियमाच्या संबंधात धोरणात्मक प्रश्नांबाबत स्वतःहून किंवा राज्य शासनाने केलेल्या विनंतीनुसार, तिला योग्य वाटेल असा सल्ला देऊ शकेल.

अपीले.

**७४.** (१) निबंधकाच्या—

(क) कलम ७ अन्वये चिटच्या कराराची नोंदणी करण्यास नकार देणाऱ्या ;

(ख) कलम ९ च्या पोट-कलम (२) अन्वये प्रारंभ प्रमाणपत्र देण्यास नकार देणाऱ्या ;

(ग) कलम २० च्या पोट-कलम (१) अन्वये किंवा कलम ३१ अन्वये कोणतीही प्रतिभूती स्वीकारण्यास नकार देणाऱ्या ; किंवा

(घ) कलम २० किंवा कलम ३१ अन्वये आकारण्यात आलेली प्रतिभूती मुक्त करण्यास नकार देणाऱ्या,

निर्णयाने व्यथित झालेला कोणताही कार्यदेशक, असा निर्णय त्यास कळविण्यात आल्यापासून तीस दिवसांच्या कालावधीत, राज्य शासनाकडे किंवा राज्य शासनाकडून **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे त्याबाबतीत अधिकार प्रदान करण्यात येईल अशा अधिकाऱ्याकडे किंवा प्राधिकाऱ्याकडे अपील करू शकेल.

(२) कलम ३४ च्या पोट-कलम (१) अन्वये निबंधकाकडून देण्यात आलेल्या आदेशाने व्यथित झालेला कोणताही कार्यदेशक किंवा इतर व्यक्ती असा निर्णय त्यास कळविण्यात आल्यापासून तीस दिवसांच्या कालावधीत, राज्य शासनाकडे किंवा राज्य शासनाकडून **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे अधिकार प्रदान करण्यात येईल अशा अधिकाऱ्याकडे किंवा प्राधिकाऱ्याकडे अपील करू शकेल.

(३) राज्य शासन किंवा पूर्वोक्त असा अधिकारी किंवा प्राधिकारी, अपिलकाराला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर अपिलावर त्याला योग्य वाटेल असा आदेश काढू शकेल आणि असा आदेश अंतिम असेल.

दस्तऐवज दाखल करण्यासाठी मुदत वाढवून देण्याचे निबंधकाचे अधिकार.

**७५.** निबंधक, त्याच्या स्वेच्छानिर्णयानुसार आणि दस्तऐवज दाखल करण्यासाठी कलम २८ चे पोट-कलम (३), कलम २९ चे पोट-कलम (२), कलम ३७ किंवा कलम ४१ अन्वये, विनिर्दिष्ट कालावधीत कार्यदेशकाने केलेल्या लेखी अर्जावरून अशा दस्तऐवजाच्या प्रती दाखल करण्यासाठी कार्यदेशकाला पंधरा दिवसांपेक्षा, अधिक नसेल इतका आणखी कालावधी देऊ शकेल.

शास्ती.

**७६.** (१) जो कोणी कलमे ४, ५, ८, ९, ११, १२, १३, १४, १९, २०, २२, २४, ३०, ३१, कलम ३३ चे पोट-कलम (४), कलमे ४६,४७ किंवा कलम ६१ चे पोट-कलम (५) यांच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करील किंवा उल्लंघन करण्यास अपप्रेरणा देईल तो, दोषसिध्दीनंतर दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या करावासाच्या शिक्षेस किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षांसाठी पात्र ठरेल.

(२) जो कोणताही कार्यदेशक,—

(क) या अधिनियमा अन्वये दाखल करणे आवश्यक आहे असा कोणताही दस्तऐवज त्यासाठी विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत किंवा वाढवून दिलेल्या आणखी कालावधीत दाखल करण्यास कसूर करील ; किंवा

(ख) चिट करारामध्ये, चिट सोडतीचा दिनांक, वेळ आणि ठिकाण यासंबंधातील आवश्यक बाबींचे पालन करण्यात कसूर करील किंवा कलम ३८ च्या पोट-कलम (३) अन्वये देण्यात आलेल्या कोणत्याही निदेशाचे अनुपालन करण्यात कसूर करील ; किंवा

(ग) या अधिनियमांन्वये आवश्यक असलेल्या कोणत्याही इतर बाबींचे पालन करण्यात कसूर करील,

तो दोषसिद्धीनंतर तीन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल.

(३) जो कोणी या अधिनियमांन्वये दाखल करणे आवश्यक असलेल्या कोणत्याही दस्तऐवजात महत्त्वाच्या तपशिलाबाबत खोटे असेल असे एखादे विधान बुद्धिपुरस्सर करील तो, दोषसिद्धीनंतर दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाच्या शिक्षेस किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षांसाठी पात्र ठरेल.

दुसऱ्या व त्यानंतरच्या दोषसिद्धिसाठी शास्ती.

**७७.** कलम ७६ च्या पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (३) खालील एखाद्या अपराधाबाबत दोषी ठरवलेली कोणतीही व्यक्ती कोणत्याही पोट-कलमाखाली एखाद्या अपराधाबद्दल पुन्हा दोषी ठरविण्यात आल्यास ती उक्त पोटकलमाच्या दुसऱ्या व त्यानंतरच्या प्रत्येक अपराधासाठी दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाच्या शिक्षेस आणि तसेच द्रव्यदंडासदेखील पात्र ठरेल.

द्रव्यदंडाचे उपयोजन.

**७८.** या अधिनियमा अन्वये कोणताही द्रव्यदंड लादणारे न्यायालय, त्या संपूर्ण द्रव्यदंडाचे किंवा त्याच्या कोणत्याही भागाचे, कार्यवाहीचा खर्च देण्यासाठी किंवा त्या बाबत उपयोजन करण्यात यावे असा निदेश देऊ शकेल.

कंपन्यांनी केलेले अपराध.

**७९.** (१) जर या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केला असेल तर, अपराध घडला त्यावेळी जी व्यक्ती कंपनीच्या कामकाजचालनाबद्दल तिची प्रभारी होती किंवा तिला जबाबदार होती अशी प्रत्येक व्यक्ती तसेच कंपनीदेखील अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानले जाईल आणि तिच्याविरूद्ध कार्यवाही केली जाण्यास व तद्नुसार शिक्षा केली जाण्यास ती पात्र असेल :

परंतु असे की, अपराध आपल्या नकळत घडला किंवा असा अपराध घडू नये म्हणून आपण शक्य तेवढी वाजवी तत्परता दाखवली होती असे जर त्या व्यक्तीने शाबित केले तर या पोट-कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे अशी कोणतीही व्यक्ती या अधिनियमात तरतूद केलेल्या कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केलेला असेल आणि कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी यांच्या संमतीने किंवा मुकानूमतीने तो अपराध करण्यात आला होता किंवा त्याने केलेल्या कोणत्याही हलगर्जीपणाशी त्या अपराधाचा कारणसंबंध जोडता येण्यासारखा आहे असे शाबित झाले तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी हासुद्धा त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानले जाईल आणि त्याच्याविरूद्ध कार्यवाही केली जाण्यास व तद्नुसार शिक्षा केली जाण्यास तो पात्र असेल ;

**स्पष्टीकरण.—**या कलमाच्या प्रयोजनासाठी,—

(क) " कंपनी " याचा अर्थ, कोणताही निगम निकाय, असा आहे आणि त्यात भागीदारी संस्था किंवा व्यक्तींचा अन्य संघ यांचा समावेश होतो ; आणि

(ख) भागीदारी संस्थेच्या संबंधात " संचालक " याचा अर्थ, भागीदारी संस्थेतील भागीदार, असा आहे.

अपराधांची दखल. **८०.** (१) कलम ११ खालील सर्व अपराध दखलपात्र असतील.

(२) महानगर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी यांच्या न्यायालयास कनिष्ठ असलेल्या कोणत्याही न्यायालयाकडून या अधिनियमाखालील शिक्षापात्र अपराधाची न्यायचौकशी केली जाणार नाही.

अपराध आपसात मिटवण्याचा अधिकार. **८१.** (१) विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीन राहून, राज्य शासनाकडून या बाबतीत अधिकार प्रदान करण्यात आलेला कोणताही अधिकारी, या अधिनियमा अन्वये एकतर फौजदारी कार्यवाही दाखल करण्यापूर्वी किंवा नंतर या अधिनियमाखालील अपराध ज्या कोणत्याही व्यक्तीने केलेला आहे किंवा केला असल्याचा वाजवी संशय आहे अशा व्यक्तीकडून अपराधाचे प्रशमन म्हणून, विहित करण्यात येईल इतक्या रकमेपेक्षा अधिक नसेल इतकी रक्कम स्वीकारू शकेल.

(२) ज्या बाबतीत पोट-कलम (१) अन्वये एखादा अपराध आपसात मिटविण्यात आला असेल त्या बाबतीत अपराधी अभिरक्षेत असेल तर त्याला सोडण्यात येईल आणि अशा अपराधाच्या बाबतीत त्याच्याविरूद्ध कोणतीही पुढील कार्यवाही केली जाणार नाही.

कोणत्याही जागेत प्रवेश करण्याचा व झडती घेण्याचा व कोणतेही दस्तऐवज जप्त करण्याचा अधिकार. **८२.** (१) निबंधक किंवा याबाबतीत त्याच्याकडून प्राधिकृत करण्यात आलेला अन्य कोणताही अधिकारी यास कोणतीही व्यक्ती या अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन करून कोणत्याही जागेत चिट चालवीत आहे किंवा चिट चालविला जाण्यास जबाबदार आहे असा सकारण संशय असेल तर, तो लेखी नमूद करण्यात येईल अशा कारणांसाठी आणि कोणत्याही रास्त वेळी अशा जागेत प्रवेश करू शकेल व झडती घेऊ शकेल आणि आवश्यक वाटेल अशी पुस्तके, नोंदवह्या, लेखे किंवा दस्तऐवज जप्त करू शकेल.

(२) निबंधक किंवा याबाबतीत त्याच्याकडून प्राधिकृत करण्यात आलेला अधिकारी, पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याकडे साहाय्यासाठी विनंती करू शकेल आणि पोट-कलम (१) खालील त्याची कर्तव्ये पार पाडताना त्याच्यासोबत व त्याला साहाय्य करण्यासाठी पोलीस अधिकाऱ्यांना घेऊ शकेल.

(३) पोट-कलम (१) खालील सर्व झडत्या, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या तरतुदींनुसार घेतल्या जातील. **१९७४ चा २.**

अधिकारी लोकसेवक असणे. **८३.** या अधिनियमांन्वये कोणतीही कर्तव्ये पार पाडण्यासाठी राज्य शासनाकडून नियुक्त करण्यात आलेला निबंधक व सर्व अधिकारी हे भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानले जातील. **१८६० चा ४५.**

अधिकार सोपविणे. **८४.** राज्य शासन, या अधिनियमांन्वये किंवा त्याखाली तयार करण्यात आलेल्या नियमांन्वये त्याच्याकडून वापरल्या जाण्यायोग्य असलेल्या (अपिलांची सुनावणी करण्याच्या आणि नियम करण्याच्या अधिकाराव्यतिरिक्त इतर) कोणत्याही अधिकाराचा, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अटी व शर्तींच्या अधीन राहून, राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडूनदेखील वापर केला जाऊ शकेल असा **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे निदेश देता येईल.

विवक्षित चिटला अधिनियम लागू नसणे. **८५.** या अधिनियमातील कोणतीही गोष्ट—

(क) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी सुरू करण्यात आलेल्या कोणत्याही चिटच्या बाबतीत ; किंवा

(ख) ज्या कोणत्याही चिटची रक्कम किंवा ज्याबाबतीत एकाच कार्यदेशकाकडून एकाच वेळी दोन किंवा त्यापेक्षा अधिक चिट सुरू करण्यात आलेले असतील किंवा चालवले जात असतील त्या बाबतीत ज्याची एकूण रक्कम शंभर रुपयांपेक्षा अधिक नसेल अशा कोणत्याही चिटच्या बाबतीत,

लागू होणार नाही.

**८६.** (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असेल तरी या अधिनियमाच्या प्रारंभानंतर कोणतीही बँक चिटचा व्यवसाय सुरू करणार नाही किंवा चालविणार नाही. बँकांनी चिटचा धंदा न करणे.

(२) ज्या बाबतीत कोणत्याही बँकेकडून अशा प्रारंभापूर्वी चिटची सुरुवात करण्यात आली होती त्या बाबतीत असा चिट अशा प्रारंभानंतर तो पूर्ण होईपर्यंत चालू ठेवता येईल आणि चिट कराराच्या आणि अशा कायद्यांच्या तरतुदी, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी त्यास लागू होत्या अशा तरतुदी, कोणत्याही असल्यास, त्या अशा चिटला लागू होतील.

१९३४ चा २. **स्पष्टीकरण**.—या कलमाच्या प्रयोजनाकरिता "बँक" याचा अर्थ, भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम, १९३४ च्या कलम २ (ख) (दोन) मध्ये व्याख्या केलेली मान्यताप्राप्त बँक किंवा सहकारी बँक, असा आहे.

**८७.** राज्य शासन, रिझर्व्ह बँकेशी विचारविनिमय करून **राजपत्रातील** अधिसूचनेव्दारे, आणि अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तीच्या अधीन राहून या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदीपासून कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तीच्या वर्गाला किंवा कोणत्याही चिटला किंवा चिटच्या वर्गाला सूट देऊ शकेल. सूट देण्याचा अधिकार.

**८८.** या अधिनियमांन्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये सद्‌भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल राज्य शासन, निबंधक किंवा राज्य शासनाचे किंवा रिझर्व्ह बँकेचे अन्य अधिकारी किंवा या अधिनियमा अन्वये कोणत्याही अधिकारांचा वापर करणारे किंवा कोणतीही कामे पार पाडणारे तिचे अधिकारी यांच्या विरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेविषयक कार्यवाही करता येणार नाही. अधिनियमांन्वये केलेल्या कृतीला संरक्षण.

**८९.** (१) राज्य शासन, रिझर्व्ह बँकेशी विचारविनिमय करून **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याकरिता नियम करू शकेल. नियम करण्याचा अधिकार.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेला बाध न येऊ देता, पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबीसाठी अशा नियमांद्वारे तरतूद करता येईल :—

(क) कलम ४ च्या पोट-कलम (२) अन्वये पूर्वमंजुरी मिळवण्यासाठी ज्या नमुन्यात व ज्या रीतीने अर्ज करता येईल तो नमुना व रीत ;

(ख) कलम ६ च्या पोट-कलम (१) च्या खंड (थ) अन्वये चिटच्या करारामध्ये समाविष्ट असू शकेल असा अतिरिक्त तपशील ;

(ग) कलम १७ अन्वये सोडतीच्या कार्यवाहीच्या कार्यवृत्तात समाविष्ट करण्यात येईल असा तपशील ;

(घ) कलम २० अन्वये प्रतिभूति देण्याच्या प्रयोजनासाठी ग्रेन चिटच्या बाबतीत निबंधकाकडून केल्या जाणाऱ्या मूल्यांकनाची पद्धती ;

(ङ) कलम २० अन्वये, कार्यदेशकाकडून देण्यात आलेली प्रतिभूती मुक्त करण्यासाठी निबंधकाकडून अवलंबण्यात येईल ती कार्यपद्धती ;

(च) कलम २३ अन्वये कार्यदेशकाकडून ठेवण्यात येतील अशा नोंदवह्या व पुस्तके आणि ज्या नमुन्यात अशा नोंदवह्या, पुस्तके ठेवण्यात येतील तो नमुना ;

(छ) कलम २४ अन्वये, चिट व्यवहाराच्या संबंधातील ताळेबंद व नफा-तोटा लेखा ज्या कालावधीच्या आत दाखल करण्यात येईल तो कालावधी ;

(ज) कलम २८ अन्वये कसूरदार वर्गणीदाराकडून, थकित हप्त्यांवर ज्या दराने व्याज देय असेल तो दर ;

(झ) कलम ४९ अन्वये चिटचे समापन करण्यासाठी केल्या जाणाऱ्या अर्जात समाविष्ट करण्यात येईल असा तपशील ;

(ञ) प्रकरण दहा अन्वये चिटच्या समापनासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(ट) कलम ६३ अन्वये देय असणारी फी ;

(ठ) चिट व्यवहाराचा ताळेबंद व नफा तोटा लेखा याची लेखापरीक्षा करणे आणि लेखापरीक्षा प्रमाणपत्र देणे ;

(ड) कलम ६४ अन्वये, निबंधकाकडे ज्या नमुन्यात व ज्या रीतीने विवाद सोपविण्यात येईल तो नमुना व ती रीत ;

(ढ) कलम, ६४ अन्वये निबंधकाकडे किंवा त्याच्या नामनिर्दिष्ट व्यक्तीकडे सोपविलेले विवाद मिटवण्यासाठी त्यांच्याकडून अनुसरण्यात यावयाची कार्यपद्धती ;

(ण) कलम ६७ च्या पोट-कलम (१) च्या खंड (च) मध्ये निर्देश केलेल्या बाबी ;

(त) कलम ८१ अन्वये, ज्या शर्तीच्या अधीन राहून आणि जी रक्कम दिल्यावर अपराधांचे प्रशमन करता येईल त्या अटी आणि रक्कम ;

(थ) या अधिनियमान्वये ज्या नमुन्यात आणि रीतीने अपील करण्यात येईल तो नमुना व रीत आणि अशा अपिलासाठी देय असलेली फी,

(द) या अधिनियमान्वये, नोटिसा किंवा इतर आदेशिका देणे व बजावणे ;

(ध) या अधिनियमान्वये, देय असलेली कोणतीही रक्कम स्वीराकरण्याची कार्यपद्धती व रीत ;

(न) विहित केली जाण्याची आवश्यकता आहे किंवा विहित करण्यात येईल अशी कोणत्याही अन्य बाब ;

(३) ह्या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, ज्या बाबतीत राज्य विधानमंडळ दोन सभागृहांचे मिळून बनलेले असेल, त्याबाबतीत त्याच्या प्रत्येक सभागृहापुढे किंवा ज्या बाबतीत असे विधानमंडळ हे एका सभागृहाचे मिळून बनलेले असेल. त्या बाबतीत त्या सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

निरसन व व्यावृत्ती.

**९०.** (१) आंध्र प्रदेश चिट फंड अधिनियम, १९७१ (१९७१ चा ९) केरळ चिठ्ठी अधिनियम, १९७५ (१९७५ चा २३). महाराष्ट्र चिट फंड अधिनियम, १९७४ (१९७४ चा ५५), तामिळनाडू राज्यात आणि चंदीगढ व दिल्ली या संघ राज्य क्षेत्रात अंमलात असलेला तामिळनाडू चिट फंड अधिनियम, १९६१ (१९६१ चा २४), उत्तर प्रदेश चिट फंड अधिनियम, १९७५ (१९७५ चा ५३), गोवा, दमण व दीव चिट फंड अधिनियम, १९७३ (१९७३ चा १६) आणि पाँडेचरी चिट फंड अधिनियम, १९६६ (१९६६ चा १८) याद्वारे निरसित करण्यात येत आहेत आणि सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७ च्या कलम ६ च्या तरतुदी, अशा प्रकारे निरसित केलेला असा प्रत्येक अधिनियम हा जणू काही केंद्रीय अधिनियम होता असे समजून अशा निरसनास लागू होतील.

(२) असे निरसन करण्यात आलेले असले तरी, पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेले अधिनियम ते ज्या रीतीने अशा प्रारंभापूर्वी अशा चिटला लागू होते त्या रीतीने या अधिनियमाच्या प्रारंभी चालू असलेल्या चिटला लागू असण्याचे चालू राहतील.

## अनुसूची

(कलम २४ पहा)

भाग एक - ताळेबंदाचा नमुना

| | दायित्वे | | | | मत्ता | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | भांडवल | रुपये | | १. | रोख रक्कम | रुपये | |
| | प्राधिकृत | रुपये | | २. | बँकेतील शिल्लक | | |
| | विक्रीस काढलेले | रुपये | | (क) | चालूखाते | रुपये | |
| | भरणा झालेले | रुपये | | (ख) | ठेव खाते | रुपये | रुपये |
| २. | राखीव निधी | | रुपये | ३. | गुंतवणूक— | | |
| ३. | ठेवी | | रुपये | (क) | चिटमधील गुंतवणूक | रुपये | |
| ४. | कर्जाऊ रक्कम | | रुपये | (ख) | शासकीय रोख्यांतील गुंतवणूक | रुपये | |
| ५. | कार्यदेशकाचे बक्षीस मिळालेल्या तिकीटासंबंधातील दायित्व | | रुपये | (ग) | इतर | रुपये | |
| ६. | देय बक्षीसाची रक्कम | | रुपये | ४. | बक्षीस मिळालेल्या वर्गणीदारांकडून देय भाग रक्कम— | | |
| ७. | कसूरदार वर्गणीदाराची देय रक्कम | | रुपये | (क) | प्रतिभूत | रुपये | |
| ८. | आगाऊ मिळालेल्या वर्गण्या | | रुपये | (ख) | अप्रतिभूत | रुपये | रुपये |
| ९. | बक्षीस न मिळालेल्या वर्गणीदाराप्रती असणारे दायित्व (बक्षिस न मिळालेल्या वर्गणीदारंकडून येणे असलेली थकबाकी दर्शविण्यात यावी). | | रुपये | ५. | बक्षीस मिळालेल्या वर्गणीदारांकडून देय थकित रक्कम | | |
| १०. | समाप्त करण्यात आलेल्या चिटमध्ये देय असलेली रक्कम | | रुपये | (क) | प्रतिभूत | रुपये | |
| ११. | बक्षीस न मिळालेल्या वर्गणीदारांना देय असलेला लिलावातील नफा. | | रुपये | (ख) | अप्रतिभूत | रुपये | |
| १२. | इतर दायित्व | | रुपये | ६. | समाप्त करण्यात आलेल्या चिटमध्ये देय असलेली रक्कम— | | |
| १३. | नफ तोटा लेखा | | रुपये | (क) | प्रतिभूत | रुपये | |
| | | | | (ख) | अप्रतिभू | रुपये | |
| | | | | ७. | पूर्वी प्रदान केलेली चिट बक्षिसाची रक्कम | | रुपये |
| | | | | ८. | वर्गणीदारांना कर्जे व अग्रिम | | रुपये |
| | | | | ९. | वाद खर्च | | रुपये |
| | | | | १०. | जागा | | रुपये |

| (१) | | (२) | | |
|---|---|---|---|---|
| | | ११. | फर्निचर व खिळण्या | रुपये |
| | | १२. | साठ्यातील मुद्रांक | रुपये |
| | | १३. | इतर मत्ता | रुपये |
| | | १४. | नफा-तोटा लेखा | रुपये |
| एकूण | रुपये | | एकूण | रुपये |
| अंमलात म्हणजे चालू असलेल्या चिटच्या एकूण चिट रकमा एकूण | | | ४, ५ आणि ६ च्या समोर दर्शविण्यात आलेल्या रकमांच्या बाबतीत विनिर्दिष्ट करावयाचा तपशील :— | |
| | | (एक) | कंपनीचे संचालक किंवा अधिकारी यांच्याकडून किंवा त्यांच्यापैकी कोणाहीकडून एकतर इतर कोणत्याही व्यक्तीबरोबर संयुक्तपणे किंवा पृथकपणे देय असलेल्या रकमा. | |
| | | (दोन) | कंपनीच्या संचालकांचा ज्या कंपन्यांमध्ये किंवा भागीदारी संस्थांमध्ये संचालक, भागीदार म्हणून किंवा खाजगी कंपन्यांच्या बाबतीत सदस्य म्हणून हितसंबंध आहे अशा कंपन्या किंवा भागीदारी संस्था यांच्याकडून देय असेल्या रकमा. | |

**भाग दोन — नफा/तोटा लेखा याचा नमुना**

| | खर्च | | | उत्पन्न | |
|---|---|---|---|---|---|
| १. | ठेवी, कर्जाऊ रकमा इत्यादींवर दिलेले व्याज | रुपये | १. | कार्यदेशकाचे कमीशन | रुपये |
| २. | वेतन, भत्ते, अधिलाभांश आणि भविष्य निर्वाह निधी | रुपये | २. | अधिलाभांश | रुपये |
| ३. | संचालकांची बैठक फी | रुपये | ३. | व्याज | रुपये |
| ४. | भाडे, कर, विमा, प्रकाशव्यवस्था | रुपये | ४. | लिलावाद्वारे नफ्यातील अविभाज्य उत्पन्न | रुपये |
| ५. | विधीविषयक आकार | रुपये | ५. | भाडे | रुपये |
| ६. | टपालखर्च, तार व मुद्रांक | रुपये | ६. | गुंतवणुकीच्या विक्रीवरील निव्वळ नफा | रुपये |
| ७. | लेखापरीक्षकांची फी | रुपये | ७. | इतर जमा | रुपये |
| ८. | दाखल करण्याची फी | रुपये | ८. | तोटा | रुपये |
| ९. | घसारा व दुरुस्ती | रुपये | | | |
| १०. | लेखनसामग्री, छपाई व जाहिरात | रुपये | | | |
| ११. | इतर खर्च | रुपये | | | |
| १२. | नफ्याची शिल्लक | रुपये | | | |
| | एकूण | | | एकूण | |

चिट फंड अधिनियम, १९८२

## The Chit fund Act, 1982

मराठी - इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अनुतोष | relief | [कलम ६७ (२) (घ) ] |
| अपराधाचे प्रशमन | composition of offence | [कलम ८१ (१) ] |
| अभिनिर्णय | adjudicated | [कलम ३९ (२) ] |
| अभिहस्तांकिती | assignee | [कलम २३ (क) (तीन) ] |
| अमूर्त मत्ता | intangible assets | [कलम १३ (३) ] |
| उगराणी | levy | [कलम ६३ ] |
| कसर | discount | [कलम २ (छ) ] |
| कसूरदार वर्गणीदार | deaulting subscriber | [कलम २ (च) ] |
| कार्यदेशक | foreman | [कलम २ (ञ) ] |
| दर्शनी मूल्य | face value | [कलम २० (१) (ख) ] |
| निर्णायक पुरावा | conclusive evidence | [कलम ७ (३) ] |
| निबंधक | Registrar | [कलम २ (ण) ] |
| नैतिक अध:पतन | moral turpitude | [कलम ७ (२) (घ) ] |
| बदली वर्गणीदार | substituted subscriber | [कलम २९ (१) ] |
| मनाई | prohibition | [कलम ५ ] |
| मालकीचा निव्वळ निधी | net owned funds | [कलम १३ (३) ] |
| वचनचिठ्ठी | promissory note | [कलम ३३ (२) ] |
| विशेष ठराव | special resolution | [कलम ३८ (४) ] |
| समापन | winding up | [कलम ४९ ] |
| संचित शिल्लक तोटा | accumulated balance of loss | [कलम १३ (३) ] |
| संभाव्य वर्गणीदारांचे हितसंबंध | interest of prospective subscriber | [कलम ६ (२) (ग) ] |
| संस्थापन समयलेख | memorandum of association | [कलम ३ (क) ] |
| स्थगित महसूल | deferred revenue | [कलम १३ (३) ] |
| हस्तांतरिती | transferee | [कलम ३४ (३) ] |

# The Chit fund Act, 1982

## चिट फंड अधिनियम, १९८२

### इंग्रजी - मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| accumulated balance of loss | संचित शिल्लक तोटा | [sec. 13 (3)] |
| adjudicated | अभिनिर्णीत | [sec. 39 (2)] |
| assignee | अभिहस्तांकिती | [sec. (23 (a) (iii)] |
| composition of offence | अपराधाचे प्रशमन | [sec. 81 (1)] |
| conclusive evidence | निर्णायक पुरावा | [sec. 7 (3)] |
| defaulting subscriber | कसुरदार वर्गणीदार | [sec. 2 (f)] |
| deferred revenue | स्थगित महसूल | [sec. 13 (3)] |
| discount | कसर | [sec. 2 (g)] |
| face value | दर्शनी मूल्य | [sec .20 (1) (b)] |
| foreman | कार्यदेशक | [sec. 2 (j)] |
| intangible assets | अमूर्त मत्ता | [sec. 13 (3)] |
| interests of prospective subscriber | संभाव्य वर्गणीदारांचे हितसंबंध | [sec. 6 (2) (c)] |
| Levy | उगराणी | [sec. 63] |
| memorandum of association | संस्थापन समयलेख | [sec. 3 (a)] |
| moral turpitude | नैतिक अधःपतन | [sec. 7 (2) (d)] |
| net owned funds | मालकीचा निव्वळनिधी | [sec. 13 (3)] |
| prohibition | मनाई | [sec. 5] |
| promissory note | वचन चिठ्ठी | [sec. 33 (2)] |
| registrar | निबंधक | [sec. 2 (0)] |
| relief | अनुतोष | [sec. 67 (2) (d)] |
| special resolution | विशेष ठराव | [sec. 38 (4)] |
| substituted Subscriber | बदली वर्गणीदार | [sec. 29 (1)] |
| Transferee | हस्तांतरिती | [sec. 34 (3)] |
| winding up | समापन | [sec. 49] |